पाक्षिक

प्रदेश बीजेपी

# मनोगत




मुंबई • वर्ष: 8 • अंक: 9 • 1 मे 2026 • पृष्ठसंख्या: 36 • किंमत: 5 रू.

## नारी शक्ति वंदन अधिनियम अभिवादन



# महिलांना आरक्षण देणारच




## अध्यक्षीय मनोगत

# काँग्रेसचा महिला विरोध

संसद आणि विधिमंडळांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे विधेयक २०२३ मध्ये लोकसभेत मंजूर झाले होते. हे आरक्षण २०२९ च्या निवडणुकीपासून लागू होईल, असे विधेयक मांडतानाच सरकारकडून स्पष्ट करण्यात आले होते. याचदरम्यान लोकसभा मतदारसंघांची परिसीमन प्रक्रिया सुरू करावी लागणार असल्याने त्यानंतर वाढणाऱ्या मतदारसंघांनुसार महिला आरक्षण लागू करण्यासाठीचे घटना दुरुस्ती विधेयक १७ एप्रिल रोजी लोकसभेत मांडण्यात आले. अडीच वर्षांपूर्वी महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा देणाऱ्या काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांनी २०२९ च्या निवडणुकीपासून महिला आरक्षण लागू करण्याच्या विधेयकाला विरोध केला. परिणामी हे विधेयक नामंजूर झाले. विरोधी पक्षांच्या विश्वासघातकी भूमिकेमुळे हे विधेयक नामंजूर झाले. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी व त्यांच्या भगिनी प्रियंका यांनी हे विधेयक नामंजूर झाल्यानंतर व्यक्त केलेला आनंद संपूर्ण देशाने पाहिला. काँग्रेस, उबाठा, समाजवादी पार्टी, तृणमुल काँग्रेस, दोन्ही कम्युनिस्ट, राष्ट्रीय जनता दल या पक्षांनी केवळ भारतीय जनता पार्टी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विरोध करण्यासाठी महिला आरक्षण विधेयकाची भ्रूण हत्या केली. विरोधकांची ही विश्वासघातकी भूमिका मतदारांपर्यंत पोहचवण्यासाठी भारतीय जनता पार्टीने देशभर कार्यक्रम केले. मुंबईत जन-आक्रोश संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. महिला सशक्तिकरणासाठी मोदी सरकारने २०१४ पासून अनेक योजना प्रत्यक्षात आणल्या आहेत. या योजनांचा देशभरातील महिलांना मोठा फायदा होत आहे. २००४ ते २०१४ या काळात डॉ.मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकार सत्तेत होते. या सरकारने महिला आरक्षण कायद्यासाठी आवश्यक ती राजकीय इच्छाशक्ती दाखवली नाही. याचे मुख्य कारण काँग्रेसला सर्वसामान्य महिलांच्या हाती सरकारच्या कारभाराची सूत्रे देण्याची इच्छा नाही. गांधी-नेहरू घराण्याप्रमाणे देशभरातील मोजक्या प्रस्थापित घराण्यांकडे सत्तेची सूत्रे राहावीत, अशीच काँग्रेस नेतृत्वाची इच्छा आहे. अखिलेश यादव, तेजस्वी यादव या मंडळींचाही महिलांना सत्तेतील वाटा देण्यास प्रखर विरोध आहे. २०२३ मध्ये मोदी सरकारकडे दोन तृतीयांश बहुमत होते. त्यामुळे काँग्रेससह सर्व विरोधकांनी महिला आरक्षण विधेयकाला नाईलाजाने पाठिंबा दिला. आपण विरोध केला तरी भाजपा आणि सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडे (एनडीए) आवश्यक ते बहुमत असल्याने आपल्या विरोधाचा काहीच उपयोग नाही, हे काँग्रेसला ठाऊक होते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) संख्याबळ कमी झाल्यामुळे काँग्रेसने डाव साधला. यातून काँग्रेसचा महिलांच्या विरोधातील भेसूर चेहरा देशापुढे पुन्हा आला. महिला आरक्षण विधेयक आणि परिसीमन विधेयक याबाबतची माहिती या अंकात विस्ताराने देण्यात आली आहे. सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांनीही ही माहिती नीट वाचणे आवश्यक आहे. मोदी सरकारने गेल्या १२ वर्षात क्रीडा क्षेत्रासाठी केलेल्या कामगिरीचाही या अंकात आढावा घेण्यात आला आहे. 'खेलो इंडिया'सारख्या योजनेचा देशातील खेळाडूंना कसा फायदा झाला आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील भारताची कामगिरी कशी सुधारली, याची माहिती या अंकात देण्यात आली आहे.

**रविंद्र चव्हाण**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे


महिलांना आरक्षण देणारच ..... ०४



मोदी विरोधातून महिला विरोधाकडे ..... ०७



महाराष्ट्राची अर्थगाथा आकड्यांतून वास्तवाकडे... ..... ११



आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताची कामगिरी सुधारली ..... १४



'क्रीडा क्रांती'चा मजबूत आराखडा ..... १७




रखडलेल्या शासकीय प्रकल्पांना गती देणारा प्रगती मंच ..... २१



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# महिलांना आरक्षण देणारच




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २८ एप्रिल रोजी वाराणसी येथे महिलांच्या भव्य मेळाव्याला संबोधित केले. यावेळी पंतप्रधानांनी केलेल्या भाषणाचा संपादित अंश...

**काशी** ही माता शृंगार गौरी, माता अन्नपूर्णा, माता विशालाक्षी, माता संकठा आणि माता गंगा यांसारख्या दैवी शक्तींची भूमी आहे. भगिनी आणि कन्यांच्या या भव्य मेळाव्याने या कार्यक्रमाला खऱ्या अर्थाने पवित्र स्वरूप दिले आहे. काशीच्या या भूमीवर, मी तुम्हा सर्व माता, भगिनी आणि कन्या यांना वंदन करतो.

हा प्रसंग नारीशक्ती आणि विकास या दोन्हींचा उत्सव असल्याचे अधोरेखित करत, पंतप्रधानांनी नमूद केले की, काशीमधील सर्व प्रकारच्या विकासाशी संबंधित प्रकल्पांचे उद्घाटन करण्यात आले असून, काशी आणि अयोध्या दरम्यानची कनेक्टिव्हिटी वाढवणाऱ्या कामांचाही यात समावेश आहे. काशी ते पुणे आणि अयोध्या ते मुंबई या दोन अमृत भारत गाडयांना हिरवा झेंडा दाखवण्यात आला, ज्यामुळे महाराष्ट्रातील लोकांना या पवित्र शहरांपर्यंत पोहोचण्यासाठी आधुनिक कनेक्टिव्हिटीचे पर्याय उपलब्ध झाले आहेत. यामुळे उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र यांच्यातील कनेक्टिव्हिटी आणखी सुधारेल, आणि लोकांना अयोध्या धाम व काशी विश्वनाथ धाम येथे पोहोचण्यासाठी आणखी एक आधुनिक पर्याय मिळाला आहे असे मोदी म्हणाले.

राष्ट्र उभारणीतील महिलांची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण आहे. नारीशक्ती ही 'विकसित भारताचा' सर्वात मजबूत आधारस्तंभ आहे. लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांसाठी आरक्षण लागू करण्याचे एक मोठे राष्ट्रीय ध्येय साध्य करण्यासाठी महिलांनी मला आशीर्वाद द्यावेत. मी तुम्हाला आश्वासन देतो की, तुमचा आरक्षणाचा हक्क प्रत्यक्षात लागू करण्यात मी कोणतीही कसर सोडणार नाही.

जेव्हा घरातील एखादी महिला सक्षम होते, तेव्हा संपूर्ण कुटुंबाला बळ मिळते, ज्यामुळे समाज आणि देशही मजबूत होतो. भारतीय महिलांना सामोरे जावे लागलेल्या ऐतिहासिक आव्हानांचे आपण कायम स्मरण ठेवणे आवश्यक आहे. पिढ्यानपिढ्या मुलींना सहन कराव्या लागलेल्या क्षमता, आवश्यकता आणि योग्यतेविषयीच्या तुच्छतापूर्ण प्रश्नांतून महिलांशी भेदभाव केला जात होता. हा भेदभाव केवळ काशीपुरता मर्यादित नव्हता तर संपूर्ण देशभरात अस्तित्वात होता. समाजात या अन्यायाला सहज स्वीकारले गेले. हे अडथळे स्वाभाविक व्यवस्था म्हणून सहज स्वीकारले गेले होते आणि हे बदललेच पाहिजे.

जुनाट समजूती मोडून काढण्याच्या आपल्या कटिबद्धतेविषयी बोलतांना पंतप्रधानांनी आपली २५ वर्षे जुनी आठवण सांगितली. जेव्हा ते गुजरातचे मुख्यमंत्री




झाले, त्यावेळी त्यांनी मुलींसाठी दोन अत्यंत पथदर्शी योजना सुरू केल्या होत्या. शाळा प्रवेशोत्सव, ज्याद्वारे अधिकाधिक मुली शाळेत येतील आणि शिक्षण पूर्ण करतील, हे पाहिले गेले, आणि मुख्यमंत्री कन्या केलवनी निधी, ज्याद्वारे मुलींना शिक्षण शुल्कात मदत केली गेली. तेव्हापासून आजपर्यंत, आमच्या सरकारच्या धोरणांमध्ये महिलांना सातत्याने सर्वोच्च प्राधान्य दिले जात आहे असे मोदी यांनी सांगितले.

२०१४ पासून राबवलेल्या सर्वसमावेशक कल्याणकारी उपक्रमांची माहिती देताना पंतप्रधानांनी अधोरेखित केले की, महिलांसाठी १२ कोटींहून अधिक शौचालये बांधण्यात आली. ३० कोटींहून अधिक महिलांची बँक खाती उघडण्यात आली. अडीच कोटींहून अधिक घरांना वीज जोडणी देण्यात आली आणि १२ कोटींहून अधिक कुटुंबांपर्यंत नळाद्वारे पाणी पोहोचविण्यात आले. या उपक्रमांमुळे भगिनी आणि कन्यांना राष्ट्रीय विकासाच्या केंद्रस्थानी स्थान मिळाले. सुकन्या समृद्धी योजना, मुद्रा योजना, मातृ वंदना योजना आणि आयुष्मान भारत यांसारख्या योजनांनी यात महत्वाची भूमिका बजावली आहे. सरकारच्या प्रत्येक महत्त्वाच्या योजनेच्या केंद्रस्थानी भगिनी आणि मुली होत्या, हेच आमच्या खऱ्या कटिबद्धतेचे मूर्तिमंत प्रतीक आहे.

दोन वर्षांपूर्वी अवघ्या एका महिन्यात वाराणसीमधील २७,००० मुलींची सुकन्या समृद्धी खाती उघडण्यात आली आणि प्रत्येक खात्यात ३०० रुपये जमा करण्यात आले. या योजनेमुळे मुलींच्या शिक्षणाला बळ मिळाले, तर मुद्रा योजनेमुळे त्यांच्या उत्पन्नाला आधार मिळाला आहे. तसेच, प्रथमच कोट्यवधी महिलांच्या नावावर प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मालमत्ता नोंदविण्यात आली आहे. आज आपल्या माता आणि भगिनी खऱ्या अर्थाने त्यांच्या




घरांच्या मालकीण बनत आहेत.

सोय आणि सुरक्षा, ह्या दोन गोष्टी, सक्षमीकरणाचा आधार ठरतात, उत्तर प्रदेशातील, सध्याची स्थिती आणि आधीची स्थिती यातील भेद आपण अनुभवत आहोत. पूर्वी उत्तर प्रदेशात, मुलींना घरातून बाहेर पडणेही कठीण होते. भारतीय न्याय संहितेने, महिलांबाबत होणाऱ्या गुन्ह्यात, त्वरित शिक्षा देण्याची तरतूद असल्याने, महिलांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण झाला आहे. त्याचवेळी, महिला पोलिस ठाण्यांचे जाळे आणि समुपदेशन केंद्रे यांचाही सातत्याने विस्तार केला जात आहे. आमच्या मुलींच्या बाबतीत कोणीही कुठलाही वाईट हेतू ठेवला, तर त्याचे काय परिणाम होतील, हे आता गुन्हेगारांनाही कळले आहे.

महिलांची आर्थिक ताकद वाढली की त्यांचा कुटुंबातील आवाजही तितकाच मजबूत होतो. गेल्या ११ वर्षांत सुमारे १० कोटी महिलांना स्वयं-सहायता गटांशी जोडण्यात आले आहे. यामध्ये काशीतील सुमारे १.२५ लाख भगिनींचा समावेश असून लाखो रुपयांच्या सहाय्यामुळे त्यांना स्वावलंबी होऊन काम करता आले आहे. अशा प्रयत्नांमुळे आतापर्यंत ३ कोटी भगिनी ‘लखपती दीदी’ बनल्या आहेत, ज्यामध्ये बनारसच्या हजारो महिलांचाही समावेश आहे. महिला सक्षमीकरणात दुग्धव्यवसायाचे मोठे योगदान आहे. काशीतील महिलांना, १०६ कोटी रुपयांचा बोनस थेट देण्यात आला आहे. काशीतील दुग्धक्षेत्रात कार्यरत महिलांना आपले काम अधिक विस्तारण्याची गरज आहे. ही तर फक्त सुरुवात आहे; बनारस वाढेल, बनास डेअरी वाढेल आणि हा बोनसही सतत वाढत राहील.

स्त्रीमध्ये परिवर्तनाचे नेतृत्व करण्याची शक्ती असते, असा सरकारचा दृष्टिकोन आहे. महिलांना आत्मनिर्भर बनवत, विकसित भारताच्या उभारणीचे नेतृत्व त्यांच्याकडे सोपवण्याचे सरकारचे प्रयत्न आहेत. बँकिंग सखी, डिजिटल पेमेंट्सला गती देत आहेत, विमा सखी विमा उपक्रमांचे नेतृत्व करत आहेत, कृषी सखी नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देत आहेत, तर नमो ड्रोन दीदी कृषी क्षेत्रातील ड्रोन क्रांतीचे नेतृत्व करत आहेत, असे त्यांनी सांगितले. याशिवाय, लष्कर, नौदल, हवाई दल, सैनिकी शाळा आणि संरक्षण अकादमी अशा सर्व क्षेत्रात, मुलींसाठी नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत. आमचे सरकार म्हणजे महिला सक्षमीकरण, महिला उत्थान आणि महिलांचे जीवन अधिक सुलभ बनविण्याची कटिबद्धता आहे. सर्व क्षेत्रांमध्ये महिलांनी दाखवलेली उत्कृष्टता लक्षात घेता त्यांना धोरणनिर्मितीमध्ये तसेच राष्ट्रीय निर्णय प्रक्रियेत अधिक उत्तम भूमिका मिळायला हवी. भगिनींच्या सहभागाची कल्पना हे नव्या संसद भवनाच्या उभारणीमागील प्रमुख कारण होते. वर्ष २०२३ मध्ये नवे संसदभवन उभे राहिल्यानंतर, ४० वर्षे रखडलेला आणि महिलांसाठी ३३ टक्के राखीव जागा देऊ करणारा नारी शक्ती वंदन कायदा मंजूर होणे हे त्या इमारतीत सर्वप्रथम झालेले कार्य होते. आता हा कायदा लवकरात लवकर लागू होणे आवश्यक आहे. अलीकडे संसदेत झालेल्या घडामोडींमुळे मी निराझालो आहे. अधिकाधिक महिलांना विधानसभा तसेच संसदेपर्यंत पोहोचणे शक्य व्हावे या उद्देशाने ही घटनात्मक सुधारणा मांडण्यात आली होती मात्र ती मंजूर होऊ शकली नाही. आसाम, केरळ, पुद्दुचेरी, बंगाल तसेच तामिळनाडू येथील महिलांनी केलेल्या विक्रमी मतदानातून महिलांचा उत्साह दिसला आहे. ■

# मोदी विरोधातून महिला विरोधाकडे

> काँग्रेस, समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस, उबाठा, राष्ट्रीय जनता दल यासारख्या पक्षांनी लोकसभेत महिला आरक्षण विधेयक नामंजूर करून आपला महिलाविरोधी चेहरा पुन्हा दाखवून दिला आहे. संसद आणि विधीमंडळात महिलांना ३३ टक्के आरक्षण ठेवण्यासाठी लोकसभेत मांडलेले नारी शक्ति वंदन विधेयक विरोधकांच्या दुटप्पीपणामुळे मंजूर होऊ शकले नाही. विरोधकांचा मोदी विरोध संपूर्ण देशाला आता परिचित झाला आहे. मात्र नरेंद्र मोदी यांना विरोध करताना विरोधकांनी महिला आरक्षणालाही विरोध करून आपला खरा चेहरा दाखवून दिला आहे.



**२००४** ते २०१४ या सलग १० वर्षाच्या काळात मनमोहन सिंग सरकार देशात सत्तेवर होते. या १० वर्षात महिला आरक्षण विधेयक मंजूर करून घेण्याची राजकीय इच्छाशक्ती श्रीमती सोनिया गांधी, राहुल गांधी यांना दाखवता आली नाही. लालूप्रसाद यांचा राष्ट्रीय जनता दल आणि मुलायम सिंह यादवांचा समाजवादी पक्ष या पक्षांनी त्यावेळी संसदेत आणि विधीमंडळांत महिलांना आरक्षण देण्यास कडाडून विरोध केला. या विरोधापुढे मनमोहन सिंग सरकार आणि काँग्रेस हतबल झाले होते. मोदी सरकारने २०२३ मध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे विधेयक संसदेत मंजूर करून घेतले. मनमोहन सिंग सरकारच्या कार्यकाळात महिला आरक्षणाचे घटना दुरुस्ती विधेयक भारतीय जनता पार्टीच्या पाठिंब्यामुळे राज्यसभेत मंजूर झाले होते. मात्र लोकसभेत समाजवादी पक्ष आणि राष्ट्रीय जनता दल यांच्या विरोधामुळे हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही. त्यावेळी मुलायम सिंह आणि लालूप्रसाद या दोन्ही नेत्यांनी महिला आरक्षणात ओबीसी कोट्याची मागणी केली होती. ही मागणी या दोन्ही नेत्यांनी त्यापूर्वी कधीच केली नव्हती. मात्र केवळ आणि केवळ महिलांना आरक्षण मिळू नये आणि आपल्या वर्चस्वाला धक्का बसू नये, या एकमेव हेतूसाठी ओबीसी कोट्याची मागणी ऐनवेळी करण्यात आली. २०२३ मध्ये महिला आरक्षण विधेयक लोकसभेत मांडले गेले होते, त्यावेळी सर्व विरोधकांनी त्याला पाठिंबा दिला होता. यावेळी मात्र महिला आरक्षणाला पाठिंबा देणाऱ्या विरोधकांनी अचानक घुमजाव करून हे विधेयक हाणून पाडले.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी व अन्य भाजपाविरोधी नेतेमंडळी, 'आमचा महिला आरक्षणाला विरोध नव्हता,' असे आता सांगत असले तरी लोकसभेतील मतदानावेळी या पक्षांनी विधेयकाच्या विरोधात मतदान



केले, हे संपूर्ण देशाने पाहिले आहे. राहुल गांधी आणि काँग्रेसने २०१४ पासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विरोध करताना राजकारणातील प्रथा आणि परंपरांचे नेहमीच उल्लंघन केले. त्याहीपेक्षा गंभीर बाब म्हणजे राहुल गांधी आणि काँग्रेसने नरेंद्र मोदी यांना विरोध करताना नक्षलवाद्यांचेही समर्थन करण्यास मागे-पुढे पाहिले नाही. नोव्हेंबर २०२५ मध्ये आंध्र प्रदेशातील माओवादी कमांडर हिडमा हा सुरक्षादलाबरोबर झालेल्या चकमकीत ठार झाला. त्यावेळी कम्युनिस्ट विचारधारेतील पक्षांनी सुरक्षा दलावर जोरदार टीका केली होती.

नक्षलवादी आणि माओवाद्यांशी चर्चा करण्याचा आग्रह कम्युनिस्ट पक्षाने तसेच डाव्या विचारधारेतील अनेक विचारवंतांनी, पत्रकारांनी धरला होता. अनेक निरपराध नागरिकांचे बळी घेणाऱ्या तसेच अनेक पोलीस कर्मचारी आणि सुरक्षा दलाच्या जवानांना निर्घृणपणे ठार करणाऱ्या हिडमाला काँग्रेसने सहानुभूती दर्शविली होती. अनेक वर्षे देशाची आणि अनेक राज्यांची सत्ता भोगणाऱ्या काँग्रेसला हिडमासारख्या माओवाद्यांमुळे देशाच्या संविधानापुढे किती मोठे आव्हान निर्माण झाले आहे, याची पुरेपूर कल्पना होती. त्यामुळेच मोदी सरकारच्या माओवादी आणि नक्षलवाद्यांविरोधातील मोहिमेला काँग्रेस नेतृत्वाने पाठिंबा देणे अपेक्षित होते. मात्र नरेंद्र मोदी यांना विरोध करण्याच्या नादात काँग्रेसने नक्षलवाद्यांना पाठिंबा देण्याचा उद्योग केला. सतत ३ लोकसभा निवडणुकीत पराजय वाटणीला आल्यामुळे वैफल्यग्रस्त झालेल्या राहुल गांधींनी माओवाद्यांचे समर्थन करण्यापर्यंत मजल मारली. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीत काँग्रेस सरकारने खलिस्तानी दहशतवाद्यांविरोधात उघडलेल्या मोहिमेला भारतीय जनता पार्टीने नेहमीच पाठिंबा दिला होता. नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पार्टीला विरोध करताना आपण देशविरोधी शक्तींच्या मागे उभे राहत आहोत, याचेही भान राहुल गांधींना राहिले नाही. राहुल गांधींनी काही वर्षापूर्वी भारत जोडो यात्रा काढली होती. या यात्रेला शहरी नक्षलवाद्यांचा सहभाग असलेल्या अनेक संघटनांनी जाहीर पाठिंबा दिला होता. ऑपरेशन सिंदूरच्या यशाबाबतही शंका घेत काँग्रेसने देशाच्या लष्कराच्या शौर्याबद्दल संशय घेतला होता. राहुल गांधी आणि काँग्रेसने आपल्या विरोधाचे रूपांतर महिलाविरोधात करून टाकले. मनमोहन सिंग सरकारच्या कार्यकाळात काँग्रेसच्या विनंतीवरून भारतीय जनता पार्टीने अन्न सुरक्षा विधेयकाला पाठिंबा दिला होता. त्यावेळी या कायद्याचे श्रेय काँग्रेसला मिळेल, असा संकुचित विचार भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाने केला नव्हता. अनेक काँग्रेस नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शिवीगाळ करतात, राहुल गांधी हे तर पंतप्रधान मोदी यांचा उल्लेख जाहीरपणे एकेरी पद्धतीने करतात. सलग १५ वर्षे सत्तेतून बाहेर राहावे लागल्याच्या निराशेतून राहुल गांधींचा तोल वारंवार ढळू लागला आहे. काँग्रेसच्या विरोधामुळे महिलांना आरक्षण मिळू शकले नाही, हे देशातील स्त्री शक्तीला ठाऊक झाले आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीमध्ये काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांना महिला मतदार धडा शिकवतील, यात काही शंका नाही. ■

# जन-आक्रोश महिला मोर्चा



जन–आक्रोश महिला मोर्चा– उपस्थिती– प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण, ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार, मुंबई अध्यक्ष आ. अमित साटम, महिला मोर्चा प्रदेश अध्यक्षा आ. चित्रा वाघ, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, मुंबईच्या महापौर रितु तावडे आदी.









जन–आक्रोश महिला संमेलन– उपस्थिती– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महिला मोर्चा प्रदेश अध्यक्षा आ. चित्रा वाघ, मुंबईच्या महापौर रितु तावडे, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे आदी.






# महाराष्ट्राची अर्थगाथा
# आकड्यांतून वास्तवाकडे...



महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आज आकड्यांच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष बदलाची नोंद करते. गुंतवणूक, ऊर्जा, उद्योग आणि पायाभूत सुविधा राज्याच्या नव्या भागांत पोहोचत आहेत. या प्रक्रियेत संधी निर्माण होत आहेत, रोजगार वाढतो आहे आणि विकासाचा वेग जमिनीवर दिसतो आहे. महाराष्ट्र दिनाच्या उंबरठ्यावर उभे राहून जेव्हा आपण राज्याच्या आर्थिक वाटचालीकडे पाहतो, तेव्हा केवळ आकडे दिसत नाहीत, दिसतो तो बदलत्या आयुष्यांचा प्रवास.

**गडचिरोलीसारख्या** नक्षलग्रस्त भागात एखादा तरुण आज पोलाद उद्योगात काम मिळेल या आशेने भविष्याची स्वप्ने पाहतो आहे. साताऱ्यातील एखादी अभियांत्रिकी शिकलेली मुलगी आता पुण्यात न जाता आपल्या जिल्ह्यातच 'आयटी पार्क'मध्ये करिअर घडवू शकेल, ही शक्यता उभी राहत आहे आणि नागपूरमध्ये सेमीकंडक्टर किंवा एरोस्पेससारख्या क्षेत्रात काम करणारा युवक, मोठे काहीतरी करायचे असेल तर राज्य सोडावे लागते ही मानसिकता मोडताना दिसतो.


### हीच खरी महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची कथा आहे



● राज्याने सुमारे २.५६ लाख कोटी रुपयांच्या मेगा आणि अल्ट्रा मेगा प्रकल्पांना दिलेली मान्यता ही केवळ गुंतवणुकीची संख्या नाही– ती एक लाखाहून अधिक रोजगारांच्या शक्यता घेऊन येणारी एक सामाजिक बदलाची प्रक्रिया आहे. महत्त्वाचे म्हणजे, ही वाढ केवळ मुंबई–पुणे या पारंपरिक पट्ट्यापुरती मर्यादित न राहता विदर्भ, मराठवाडा आणि कोकणपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न दिसतो आहे.

● पूर्वी उद्योग म्हणजे मुंबई, पुणे किंवा ठाणे, अशीच एक मर्यादित व्याख्या होती. पण आज चित्र बदलते आहे. गडचिरोलीत पोलाद उद्योग, नागपूरमध्ये सेमीकंडक्टर आणि एरोस्पेस गुंतवणूक, तर सोलापूर सातारा सारख्याठिकाणी आयटी पार्क – हे सगळे सांगतेय की महाराष्ट्राचा विकास आता केवळ काही शहरांचा न राहता संपूर्ण राज्याचा होत आहे.

### पायाभूत सुविधा समिती



● मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीची बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मंत्री उदय सामंत आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्रात पायाभूत सुविधांच्या दिशेने १८ हजार १३० कोटींच्या मेट्रोसह तीन द्रुतगती महामार्गांच्या कामांना मंजुरी देऊन पायाभूत कामांचा वेग वाढवला आहे.

● उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या १४ व्या बैठकीत या प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला. भविष्यातील तंत्रज्ञानावर आधारित क्षेत्रांना प्राधान्य देत सोलर सेल, मॉड्युल, इन्गॉट–वेफर्स, ग्रीन स्टील, हरित अमोनिया, इलेक्ट्रॉनिक्स, अवकाश व संरक्षण साहित्य, लिथियम–आयन बॅटरी, इलेक्ट्रिक वाहन आणि गॅस–टू–केमिकल अशा क्षेत्रांतील १८ मेगा व अल्ट्रा मेगा प्रकल्पांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली.

● पायाभूत सुविधांइतकाच महत्त्वाचा एक शांत बदल प्रशासनाच्या पातळीवर घडताना दिसतो– गुंतवणूक सुलभ करण्याचा. परवानग्यांची गुंतागुंत कमी करणे, 'एक खिडकी योजना' प्रभावीपणे राबवणे आणि धोरणांमध्ये पारदर्शकता आणणे यामुळे उद्योगांसाठी महाराष्ट्र अधिक विश्वासार्ह ठरत आहे. गुंतवणूकदारांना किती वेळ लागेल? हा प्रश्न कमी पडतोय आणि किती लवकर सुरू करता येईल? हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतोय.

### पारदर्शक धोरणांमुळे गुंतवणूक सुलभ



● याच विश्वासाचे रूपांतर मोठ्या प्रमाणात परकीय गुंतवणुकीत होताना दिसते. आर्थिक वर्ष २०२४–२५ मध्ये देशात आलेल्या एकूण परदेशी गुंतवणुकीपैकी सुमारे ४०% गुंतवणूक महाराष्ट्रात आली. १,६४,८७५ कोटींची विक्रमी गुंतवणूक आणि त्यात झालेली ३२% वाढ ही केवळ आर्थिक आकडेवारी नाही – ती जागतिक गुंतवणूकदारांनी महाराष्ट्रावर ठेवलेल्या विश्वासाची नोंद आहे.

● दावोस येथील जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीत झालेल्या सुमारे ३० लाख कोटींच्या सामंजस्य करारांनी या विश्वासाला आणखी बळ दिले. महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल २०२५–२६ नुसार, राज्याची अर्थव्यवस्था ७.९% दराने वाढण्याचा अंदाज आहे, ज्यामुळे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत आणि स्थलांतरितांचा ओघ वाढत आहे.

### आयटी पार्क

पण ही गुंतवणूक फक्त मोठ्या शहरांमध्ये मर्यादित





राहत नाही, हे विशेष आहे. साताऱ्यासोबतच सोलापूरसारख्या शहरांत उभे राहत असलेले आयटी पार्क, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात निर्माण होणाऱ्या नवीन औद्योगिक संधी – हे सगळे सांगते की करिअर घडवण्यासाठी मुंबई किंवा पुणेच हा एकमेव पर्याय राहिलेला नाही. स्थानिक तरुणांना आपल्या जिल्ह्यातच जागतिक दर्जाच्या कंपन्यांमध्ये काम करण्याची संधी मिळणे, ही एक मोठी मानसिक आणि आर्थिक क्रांती आहे.

● रोजगाराच्या पातळीवरही हा बदल स्पष्ट दिसतो. कोकणात रायगड आणि पालघरमध्ये हजारो रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे; विदर्भात गडचिरोली, नागपूर, भंडारा, चंद्रपूर या भागांत नवीन उद्योगांमुळे मोठ्या प्रमाणावर संधी निर्माण होत आहेत; तर मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातही उद्योगांची चक्रं वेगाने फिरू लागली आहेत. 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण'सारख्या उपक्रमांमुळे तरुणांना थेट उद्योगांमध्ये कामाचा अनुभव मिळतो आहे – म्हणजे शिक्षण आणि रोजगार यामधील दरी कमी होत आहे.

● याचे एक मोठे परिणाम म्हणजे बेरोजगारी दरात झालेली घट. राज्याचा बेरोजगारी दर सुमारे ३.३% पर्यंत खाली आला आहे. ग्रामीण भागात तो आणखी कमी आहे. ही संख्या केवळ सांख्यिकीय यश नाही; ती त्या कुटुंबांची



गोष्ट आहे जिथे पहिल्यांदाच स्थिर उत्पन्न घरात येत आहे.

● महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आज ५१ लाख कोटी रुपयांच्या सकल राज्य उत्पन्नाच्या दिशेने वाटचाल करत आहे आणि देशातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून उभी आहे. सेवा क्षेत्र आणि उद्योग क्षेत्रातील सातत्यपूर्ण वाढ, मजबूत पायाभूत सुविधा, आणि जवळपास ६३ लाख MSME युनिट्समधून निर्माण होणारा रोजगार – हे सगळं मिळून एक व्यापक आर्थिक जाळे तयार करते, जे मोठ्या उद्योगांपासून छोट्या उद्योजकांपर्यंत सर्वांना जोडते.

● महाराष्ट्रात सुमारे ४०% परकीय गुंतवणूक (FDI) आर्थिक वर्ष २०२४–२५ मध्ये देशात आलेल्या एकूण परदेशी गुंतवणुकीपैकी सुमारे ४०% गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात झाली आहे. त्याच आर्थिक वर्षात महाराष्ट्राने १,६४,८७५ कोटींची विक्रमी गुंतवणूक आकर्षित केली, जी मागील वर्षाच्या तुलनेत ३२% जास्त आहे.

● एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत भारताचा एकूण परदेशी गुंतवणुकीचा कल १८% ने वाढला असून, त्यातही महाराष्ट्र आघाडीवर आहे. २०२५–२६ च्या तिसऱ्या तिमाहीत (Q3) महाराष्ट्राने १,३४,१८८ कोटींच्या गुंतवणुकीसह प्रथम क्रमांक राखला आहे.

● महाराष्ट्रानंतर कर्नाटक (९.४ अब्ज डॉलर) आणि तामिळनाडू (३.६ अब्ज डॉलर) या राज्यांचा क्रमांक लागतो. काही काळापूर्वी काही मोठे प्रकल्प राज्याबाहेर गेल्यामुळे महाराष्ट्राची वाटचाल मंदावेल, अशी टीका करण्यात आली होती. पण आज नव्या गुंतवणुकीचा वेग, विविध भागांत पोहोचणाऱ्या संधी, आणि वाढत्या रोजगारनिर्मितीमुळे त्या टीकेला प्रत्यक्ष कामातून उत्तर मिळताना दिसते. ■

# खेलो इंडियामुळे ऑलिम्पिकसारख्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताची कामगिरी सुधारली



**खेलो** इंडिया उपक्रमामुळे अनेक युवा खेळाडूंना व्यासपीठ मिळाले असून त्यांनी ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत यश मिळवले आहे. पॅरिस २०२४ ऑलिम्पिकमध्ये चमकलेल्या अनेक खेळाडूंचा प्रवास खेलो इंडियामधून सुरू झाला होता. खेलो इंडियामुळे तयार झालेल्या ऑलिम्पिक पदक विजेत्या आणि उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची नावे खालीलप्रमाणे आहेत:

**मनू भाकर :** पॅरिस २०२४ ऑलिम्पिकमध्ये नेमबाजीत दोन कांस्यपदके जिंकणारी ऐतिहासिक कामगिरी.

**सरबज्योत सिंग :** पॅरिस २०२४ ऑलिम्पिकमध्ये नेमबाजीत कांस्यपदक.

**स्वप्नील कुसळे :** पॅरिस २०२४ ऑलिम्पिकमध्ये नेमबाजीत कांस्यपदक.

**अमन सेहरावत :** पॅरिस २०२४ ऑलिम्पिकमध्ये कुस्तीत कांस्यपदक विजेता.

**नीरज चोप्रा :** भालाफेकीत टोकियो २०२० ऑलिम्पिक मध्ये सुवर्णपदक विजेता आणि पॅरिस २०२४ मध्ये रौप्यपदक विजेता. खेलो इंडियाच्या पायाभूत सुविधांची नीरज चोप्रा याला मोठी मदत झाली आहे.

**लक्ष्य सेन :** पॅरिस २०२४ ऑलिम्पिकमध्ये बॅडमिंटनमध्ये उल्लेखनीय कामगिरी (उपांत्य फेरीपर्यंत मजल).

मोदी सरकारने २०१७-१८ मध्ये सुरू केलेला खेलो इंडिया उपक्रम तळागाळातील क्रीडा प्रतिभा शोधणे, पायाभूत सुविधा सुधारणे आणि खेळाडूंना आर्थिक मदत करणे या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी काम करत आहे.

**तळागाळातून गुणवान खेळाडू शोधणे :** खेलो इंडिया गेम्स (यूथ, युनिव्हर्सिटी, विंटर, पॅरा) द्वारे ग्रामीण आणि दुर्गम भागातील हजारो नवीन खेळाडू शोधले जात आहेत.

**आर्थिक पाठबळ आणि शिष्यवृत्ती :** निवडलेल्या प्रतिभावान खेळाडूंना दरवर्षी ५ लाखांची (८ वर्षांसाठी) शिष्यवृत्ती दिली जाते, ज्यामुळे त्यांना प्रशिक्षणावर लक्ष केंद्रित करता येते.

**क्रीडा पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा :** देशभरात ३००

## निर्माण झालेल्या पायाभूत सुविधांमध्ये विविध प्रकारच्या सुविधांचा समावेश आहे

- १२६ बहुउद्देशीय क्रीडागृह
- ६४ ॲथेलेटिक ट्रॅक
- २५ फुटबॉल मैदाने
- २९ हॉकी मैदाने
- १६ जलतरण तलाव
- ८४ इतर क्रीडा सुविधा

हून अधिक मान्यताप्राप्त अकादमी आणि १,००० हून अधिक खेलो इंडिया केंद्रे स्थापन केली जात आहेत, ज्यामुळे खेळाडूंना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण मिळत आहे.

**खेलो इंडिया आदिवासी क्रीडा स्पर्धा :** भारताच्या आदिवासी समाजात उत्तम क्रीडा प्रतिभा आहे. हे खेळाडू ताकदवान, कुशल आणि पारंपरिक खेळांशी जोडलेले आहेत. मात्र, यापैकी बरीच प्रतिभा आतापर्यंत संघटित क्रीडा मंचांपासून दूर राहिली होती. 'खेलो इंडिया आदिवासी क्रीडा स्पर्धा' या प्रतिभेला आता राष्ट्रीय स्तरावर आणण्याचा प्रयत्न करत आहेत.

देशभरातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये खेलो इंडिया कार्यक्रमांतर्गत क्रीडा पायाभूत सुविधांचा लक्षणीय विस्तार झाला असून **आतापर्यंत एकूण ३४४ प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. या प्रकल्पांसाठी एकूण ३,१५८.१५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून त्यापैकी २,७३०.९५ कोटी रुपये आधीच वितरित झाले आहेत.** यावरुन, अंमलबजावणीतील सातत्यपूर्ण प्रगती दिसून येते.

### पदकांची वाढती संख्या आणि 'खेलो इंडिया'

२०२२ मध्ये झालेल्या आशियाई स्पर्धांमध्ये भारताला १०७ पदके मिळाली. भारताला प्रथमच तीन आकडी पदके मिळाली आहेत. हे सर्व नशीबाने एका रात्रीत घडलेले नाही. त्यामागे गेल्या ४-५ वर्षात शासकीय पातळीवरून गुणवान खेळाडू तयार करण्यासाठी 'खेलो इंडिया' अभियानाच्या माध्यमातून झालेले नियोजनपूर्वक प्रयत्न आहेत, याची दखल घेणे आवश्यक आहे.

चीन, जपान यासारख्या देशांच्या साथीने खेळताना आपण पदकांची शंभरी पार शकलो ही मोठी घटना आहे. प्रचंड लोकसंख्येचा देश असूनही भारताला आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये कायमच पदकांचा दुष्काळ पहावयास मिळाला




आहे. याची अनेक कारणे आहेत. सर्वात मुख्य कारण देशात क्रीडा संस्कृती तयार झाली नव्हती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हीच बाब केंद्र स्थानी ठेवत २०१८ मध्ये 'खेलो इंडिया' नावाचा उपक्रम सुरू केला. त्यासाठी सुमारे ४ हजार कोटी एवढ्या रकमेची तरतूदही केली. अन्य क्षेत्रात भारताची विकासाकडे वाटचाल सुरू असताना क्रीडा क्षेत्र मागे राहू नये, हा पंतप्रधान मोदींचा आग्रह आहे. क्षमता असूनही भारतीय खेळाडू क्रिकेटचा अपवाद वगळता आंतरराष्ट्रीय स्तरावर का यशस्वी ठरत नाहीत, यामागची कारणे पंतप्रधान मोदी यांनी विविध क्रीडा प्रकारातील ज्येष्ठ क्रीडापटूंशी खुलेपणाने संवाद साधत जाणून घेतली. देशाचा पंतप्रधान ख्यातनाम खेळाडूंशी स्वत:हून संपर्क साधतो आणि भारतीय खेळाडू आंतरराष्ट्रीय पातळीवर का मागे राहतात, याची कारणे जाणून घेतो, असा अनुभव देशाने प्रथमच घेतला.

**ज्येष्ठ क्रीडापटूंशी संवाद साधल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी 'खेलो इंडिया' नावाचे अभियान केंद्र सरकारमार्फत सुरू केले.** शहरी भागाबरोबर ग्रामीण, दुर्गम भागातील सक्षम क्रीडापटूंना आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यातून खेळाडूंचे कौशल्य अधिक विकसित व्हावे, या हेतूने हे अभियान सुरू करण्यात आले. या अभियानात 'खेलो इंडिया युवा स्पर्धा' आणि 'खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धा' यांचे आयोजन गेल्या ६-७ वर्षांपासून केले जात आहे. या योजनेमार्फत प्रदेश पातळीवरील 'खेलो इंडिया केंद्र' सुरू करण्यात आले. या अभियानातून गेल्या ५ वर्षात १ हजाराहून अधिक 'खेलो इंडिया केंद्र' जिल्हा पातळीवर सुरू झाली आहेत. २३ लाख शालेय विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणवत्तेनुसार क्रीडा क्षेत्रात संधी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्याचे उद्दिष्ट मोदी सरकारने ठेवले आहे. वार्षिक



**देशातील अनेक गुणवत्तापूर्ण खेळाडूंना आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकण्यासाठी जे काही सहकार्य आवश्यक आहे, ते करण्याची तयारी 'खेलो इंडिया'मार्फत केंद्र सरकारने दाखवली आहे. ऑलिंपिक, आशियाई स्पर्धातील कामगिरीचे श्रेय खेळाडूंचे आहेच. मात्र मोदी सरकारने त्यासाठी घेतलेली मेहनत नजरेआड करून चालणार नाही. एवढेच, या निमित्ताने सांगावयाचे आहे.**

क्रीडा स्पर्धांचे आयोजन, गुणवान खेळाडूंचा शोध घेणे, शालेय खेळाडूंना आवश्यक ते प्रशिक्षण देणे आदी हेतू ठेवून 'खेलो इंडिया' अभियान कार्यरत आहे. अन्य शासकीय योजनांप्रमाणे हे अभियान मोदी सरकारच्या थेट देखरेखीखाली सुरू आहे.

'खेलो इंडिया स्पर्धा' जेथे होतील तेथे खेळाडूंसाठी आवश्यक त्या सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध होतील, याकडे लक्ष पुरवले जाते. जिल्हा स्तरावर स्टेडियमसारख्या आवश्यक सुविधा उत्तम दर्जा ठेवत निर्माण करण्यात आल्या. ज्या ठिकाणी स्टेडियम आहे तेथील स्टेडियमचा दर्जा आणखी सुधारण्यात आला. सर्व खेळांसाठी प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. ज्या ठिकाणी क्रीडापटूंसाठी सुविधा उपलब्ध आहेतच त्या ठिकाणच्या सुविधांचा दर्जा आणखी सुधारला गेला. 'खेलो इंडिया' स्पर्धांचे दूरचित्रवाणी माध्यमातून थेट प्रक्षेपण सुरू करण्यात आले. या स्पर्धांमध्ये केवळ मुलांनी सहभागी व्हावे, हा 'खेलो इंडिया'चा उद्देश नव्हता. शाळकरी मुलांनी प्रेक्षक, क्रीडा चाहते म्हणून क्रीडांगणाकडे वळावे हा हेतू त्यामागे होता. या स्पर्धातून निवडल्या गेलेल्या खेळाडूंना शिष्यवृत्ती दिली जाते. या शिष्यवृत्तीतून खेळाडूंना प्रत्येक महिन्याला ठराविक रक्कम मिळते. आवश्यक ते क्रीडा साहित्य, उपकरणे घेण्यासाठी ही शिष्यवृत्ती उपयुक्त ठरते. आवश्यक तो आहार घेण्यासाठीही शिष्यवृत्ती रकमेचा वापर केला जातो. शिष्यवृत्तीचे पैसे मुलांच्या बँक खात्यात थेट जमा होतात. शिष्यवृत्तीसाठी खेळाडूंना सरकारी अधिकाऱ्यांकडे, सरकारी कार्यालयात खेटे मारण्याची गरज नाही. ठिकठिकाणी क्रीडा विद्यापीठे सुरू करण्याचे धोरणही मोदी सरकारने अंमलात आणले. याचा एकत्रित परिणाम हळूहळू खेळाडूंची कामगिरी सुधारण्यात होतो आहे, असे आशियाई स्पर्धातील भारताची कामगिरी पाहिल्यानंतर ठामपणे म्हणावे लागते.

**'टार्गेट ऑलिंपिक पोडियम स्कीम'च्या माध्यमातून खेळाडूंना ५० हजार रुपयांचा भत्ता दरमहा दिला जातो.** याखेरिज उत्तम दर्जाचे प्रशिक्षण, आवश्यक त्या तांत्रिक सुविधा, साहित्य-उपकरणे हेही या योजनेच्या माध्यमातून पुरविले जाते. पी.व्ही.सिंधू, साक्षी मलिक यासारख्या खेळाडूंना या योजनेचा फायदा झाला आहे. **पी.व्ही.सिंधूने 'टार्गेट ऑलिंपिक पोडियम स्कीम' चा आपल्याला कसा फायदा झाला, हे जाहीरपणे सांगितले आहे.** आशियाई स्पर्धेत नेमबाजीचे सुवर्ण पदक मिळवणार्या मनू भाकर हिनेही 'खेलो इंडिया' स्पर्धेबद्दल गौरवोद्गार काढले आहेत. पालक, प्रशासकीय अधिकारी, सरकारी कर्मचारी अशा सर्व संबंधित समाजघटकांचा खेळाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे, या दृष्टीने क्रीडा संस्कृती तयार करण्याचा पंतप्रधान मोदी यांचा आग्रह आहे. २५०० युवा खेळाडूंना दरवर्षी ६ लाख २८ हजार एवढा भत्ता 'खेलो इंडिया' च्या माध्यमातून दिला जात आहे. अनेक युवकांकडे गुणवत्ता असते, कठोर परिश्रम घेण्याची तयारी असते. मात्र आवश्यक ते साहित्य, प्रशिक्षण घेण्यासाठी अशा खेळांडूकडे/पालकांकडे पैसे नसतात. कुटुंबियांची आर्थिक स्थिती मर्यादित असल्याने मुलाच्या/मुलीच्या क्रीडा प्रशिक्षणासाठी एवढी रक्कम खर्च करण्याची तयारी अनेकजण दाखवत नाही, ही वस्तुस्थिती आहे. ■

# 'क्रीडा क्रांती'चा मजबूत आराखडा



एकेकाळी भारतात खेळ हा मुलांसाठी गृहपाठ आणि शाळेच्या मधल्या वेळेतील एक आनंददायी छंद होता. खेळ हे एक व्यवहार्य करिअर मानले जात नाही, असा एक सामान्य गैरसमज होता. मर्यादित क्रीडा पायाभूत सुविधा आणि समाजाने खेळांपेक्षा शिक्षणाला दिलेले प्राधान्य हे याचे कारण होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ही मानसिकता बदलली आणि तरुणांमध्ये क्रीडा क्षेत्रात करिअर करण्याची आकांक्षा निर्माण केली. आज लडाखचा सायकलपटू त्सेवांग नोरबू असो; नागालँडचा पॅरा-ॲथलीट होटोजे सेमा होकाटो असो किंवा खेलो इंडियाचे २,९०० पेक्षा जास्त खेळाडू असोत. खेलो इंडिया अशा खेळाडूंना नव्या उंचीवर घेऊन जात आहे.



**खेलो** इंडिया योजना – राष्ट्रीय क्रीडा विकास कार्यक्रम सुरू करून भारत सरकार क्रीडा क्षेत्रात व्यापक सार्वजनिक सहभाग आणि उत्कृष्टतेला प्रोत्साहन देत आहे. या उद्देशाने २२ एप्रिल, २०१६ रोजी संबंधित संस्थांना ही योजना सुरु करण्यात आली. २७ सप्टेंबर २०१६ रोजी या कार्यक्रमात काही बदल करण्यात आले. यामध्ये क्रीडा पायाभूत सुविधांची निर्मिती आणि श्रेणीसुधार क्रीडा स्पर्धा आणि प्रतिभा विकास, 'फिट इंडिया अभियान' आणि क्रीडा क्षेत्राद्वारे सर्वसमावेशकतेला प्रोत्साहन यांचा समावेश आहे. गेल्या दशकात देशाने या क्षेत्रांमध्ये अनेक महत्वाचे टप्पे गाठले आहेतच, त्याचबरोबर या योजनेमुळे क्रीडा प्रतिभाही मोठ्या प्रमाणात समोर आली आहे. युवकांना उत्कृष्ट पायाभूत सुविधा, प्रशिक्षण आणि आर्थिक सहाय्य मिळाल्यामुळे आता अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदक विजेत्यांच्या व्यासपीठावर राष्ट्रगीताचे सूर निनादताना ऐकू येत आहे. ■

## गुणवान खेळाडू शोधणारे, घडवणारे अभियान

# खेलो इंडिया मिशन

क्रीडा क्षेत्र रोजगार, कौशल्य आणि नोकरीच्या असंख्य संधी उपलब्ध करुन देते म्हणूनच केंद्र सरकारने २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात 'खेलो इंडिया मिशन' सुरू करण्याची घोषणा केली. या महत्वाच्या उपक्रमात प्रतिभा हेरून विकसित करणे, उत्कृष्टता केंद्रांच्या स्वरूपात पायाभूत सुविधांची निर्मिती करणे आणि रोजगार निर्मिती यावर लक्ष केंद्रीत केले आहे. 'खेलो इंडिया मिशन' प्रतिभावान खेळाडूंना सुरूवातीपासून ते व्यावसायिक स्तरापर्यंत सहाय्य करणारी एक परिसंस्था निर्माण करेल. राज्यस्तरीय उपक्रमांद्वारे प्रत्येक जिल्ह्यात खेलो इंडिया प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे, क्रीडा विज्ञान, क्रीडा मानसशास्त्र, पोषण यांसह सुव्यवस्थित उपाययोजना राबवणे, सद्यस्थितीतील निरीक्षणासाठी डेटा प्लॅटफॉर्म तयार करणे आणि २०३६ सालापर्यंत भारताला क्रीडा क्षेत्रातील अग्रगण्य राष्ट्रांमध्ये स्थान मिळवून देणे असे या मिशनचे उद्दिष्ट आहे.

**खेलो** इंडिया योजना, टार्गेट ऑलिम्पिक पोडियम योजना (टॉप्स) आणि कीर्ती (खेलो इंडिया रायझिंग टॅलेंट आयडेंटिफिकेशन) यांनी खेळाडूंच्या प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांना पाठिंबा देण्यासाठी एक व्यापक आराखडा तयार केला आहे. शालेय, विद्यापीठ, महिला, पॅरा-ॲथलीट आणि आदिवासी खेळाडू या स्तरांवर प्रतिभा शोधून त्यांना घडवण्याचे काम अधिक वेगाने करण्यात आले आहे. परिणामी, गेल्या दशकातील क्रीडा क्षेत्रातील

### आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके मिळवण्याची क्षमता असलेल्या १४ क्रीडाप्रकारांवर विशेष भर

**'खेलो इंडिया' अंतर्गत केंद्र सरकारने राज्यांसोबत मिळून 'एक राज्य - एक खेळ' या संकल्पनेवर भर दिला आहे. तसेच, आगामी ऑलिंपिक स्पर्धांमध्ये अधिक चांगल्या कामगिरीसाठी सर्वाधिक पदके जिंकण्याची जास्त शक्यता असलेल्या १४ क्रीडाप्रकारांची निवड करण्यात आली आहे. खेलो इंडिया अंतर्गत तयार केल्या जाणाऱ्या कोणत्याही प्रस्तावांमध्ये किंवा कार्यक्रमांमध्ये या १४ खेळांना प्राधान्य द्यावे, ज्यामुळे अधिकाधिक खेळाडू सहभागी होऊ शकतील आणि आपली क्षमता विकसित करू शकतील, असे आवाहन केंद्र सरकारने राज्य सरकारांना केले आहे.**

### मोहिमेचे पाच आधारस्तंभ

- **प्रतिभावान खेळाडू शोधून त्यांना व्यावसायिक स्तरापर्यंत विकसित करण्यासाठी विविध स्तरांवर प्रशिक्षण केंद्रे स्थापन केली जातील.**
- **प्रशिक्षक आणि सहाय्यक कर्मचारी वर्ग तयार केला जाईल.**
- **क्रीडा क्षेत्रात क्रीडा विज्ञान आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढवला जाईल.**
- **क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी स्पर्धा आणि लीग आयोजित केल्या जातील.**
- **प्रशिक्षण आणि स्पर्धेसाठी क्रीडा पायाभूत सुविधा विकसित केल्या जातील.**

भारताच्या कामगिरीकडे सुवर्णकाळ म्हणून पाहिले जाऊ शकते. ऑलिम्पिक, पॅरालिम्पिक आणि आशियाई खेळांसारख्या आंतरराष्ट्रीय मंचांवर खेळाडूंनी विक्रमी कामगिरी केली आहे. कल्याणकारी योजना आणि उपक्रमांच्या माध्यमातून, सरकार केवळ तळागाळातील प्रतिभेची ओळख करून त्यांना घडवत नाही, तर खेळाडूंना त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत आणि त्यानंतरही आवश्यक ते सहाय्य मिळेल याचीही खात्री करत आहे. पायाभूत सुविधा, प्रशिक्षण आणि खेळाडूंच्या कल्याणामध्ये केलेल्या भरीव गुंतवणुकीमुळे, भारत क्रीडा क्षेत्रात जागतिक स्तरावर अग्रगण्य बनण्याच्या दिशेने आशादायी वाटचाल करत आहे.

### खेलो इंडिया बनले क्रीडा विकासासाठीचे व्यासपीठ

देशातील क्रीडा प्रतिभांचा शोध घेणे, त्यांना घडवणे आणि क्रीडा कौशल्य सादर करण्यासाठी तसेच प्रतिभावान मुलांना उत्कृष्टतेकडे नेणारा विकासाचा मंच म्हणून खेलो इंडियाने आपली ओळख निर्माण केली आहे. खेलो इंडिया ट्रायबल गेम्स २०२६ सह खेलो इंडिया गेम्सच्या २३ आवृत्त्या आयोजित करण्यात आल्या आहेत. यामध्ये खेलो इंडिया युथ गेम्सच्या ७ आवृत्त्या, खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्सच्या ५ आवृत्त्या, खेलो इंडिया विंटर गेम्सच्या ५ आवृत्त्या, खेलो इंडिया पॅरा गेम्सच्या २ आवत्त्या, खेलो इंडिया बीच गेम्सच्या २ आवृत्त्या आणि खेलो इंडिया वॉटर स्पोर्ट्स फेस्टिव्हलच्या १ आवृत्तीचा समावेश आहे. या खेळांमध्ये ६० हजारांपेक्षा जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवला.

### ३४ क्रीडा प्रकारांमध्ये 'खेलो इंडिया महिला लीग'

खेळांमध्ये महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी 'खेलो इंडिया महिला लीग' आयोजित केल्या जात आहेत. फेब्रुवारी २०२६ पर्यंत, ३४ क्रीडा प्रकारांमध्ये महिला लीग आयोजित करण्यात आल्या होत्या. महिला खेळाडूंसाठी २,४०७ स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. यामध्ये २ लाखांपेक्षा जास्त महिला सहभागी झाल्या.

### जम्मू आणि काश्मीरमध्ये प्रत्येक जिल्ह्यात ५ खेलो इंडिया केंद्रे

खेलो इंडिया योजनेअंतर्गत, सर्वसाधारण नियमांनुसार जम्मू आणि काश्मीर या केंद्रशासित प्रदेशातील प्रत्येक जिल्ह्यात ५ खेलो इंडिया केंद्रे स्थापन करण्याची तरतूद अधिसूचित करण्यात आली आहे. जम्मू आणि काश्मीरसाठी हा एक विशेष उपक्रम आहे. आतापर्यंत या केंद्रशासित प्रदेशात १०० खेलो इंडिया केंद्रे अधिसूचित करण्यात आली आहेत.

### विद्यार्थ्यांमधील प्रतिभा शोधण्याच्या उद्देशाने, खेलो इंडिया उदयोन्मुख प्रतिभा शोध (कीर्ती) उपक्रम

देशातील ९ ते १८ वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांमधील प्रतिभा शोधण्याच्या उद्देशाने आणि त्यांना आणखी पैलू पाडण्याच्या उद्देशाने कीर्ती (खेलो इंडिया उदयोन्मुख प्रतिभा शोध) हा एक राष्ट्रव्यापी उपक्रम सुरु करण्यात आला आहे. देशभरातील १७४ पेक्षा जास्त प्रतिभा मूल्यांकन केंद्रांमार्फत प्रतिभा ओळखण्याचे काम केले जात आहे. या उपक्रमामुळे भारताला जागतिक क्रीडा

**आज खेलो इंडिया, युनिव्हर्सिटी गेम्स, खेलो इंडिया युथ गेम्स, खेलो इंडिया विंटर गेम्स आणि खेलो इंडिया पॅरा गेम्स होत आहेत. यामुळे आमच्या खेळाडूंचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांची प्रतिभा अधिक उजळून समोर येते.**

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

# खेलो इंडियामध्ये तयार करणार पायाभूत सुविधा

**1067**
खेलो इंडिया केंद्रे 750 पेक्षा जास्त जिल्ह्यांमध्ये.

**322** अकादमींना
खेलो इंडिया अंतर्गत खेळाडूंना प्रशिक्षण देण्यासाठी मान्यता.

**27,500**
पेक्षा जास्त खेळाडू खेलो इंडिया केंद्रांमध्ये प्रशिक्षण घेत आहेत.

**344**
नवीन क्रीडा पायाभूत सुविधा प्रकल्पांना ३२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये मंजुरी.

**3,158**
कोटी रुपये या प्रकल्पांसाठी खर्च येईल.

## ८ पटीने वाढली खेलो इंडियासाठीची आर्थिक तरतूद

- २०१६-१७ ११८ कोटी रुपये
- २०२६-२७ ९२८ कोटी रुपये

- १७,००० पेक्षा जास्त क्रीडा पायाभूत सुविधा २,५०० पेक्षा जास्त ऑलिम्पिक स्तरीय खेळ.
- ४७,०१२ खेळाडूंनी खेलो इंडिया गेम्समध्ये सहभाग घेतला आहे.
- १,३२७ प्रशिक्षक आणि सहाय्यक कर्मचारी आहेत.
- २३,००० पेक्षा जास्त खेळाडूंना पाठिंबा मिळाला आहे.
- २३.६८ कोटी लोकांनी फिट इंडिया कार्यक्रमात भाग घेतला आहे.
- ४,५०,४४५ शाळांना फिट इंडिया ध्वज मिळाला आहे.

***२,९०५ खेलो इंडियाच्या खेळाडूंना त्यांच्या पार्श्वभूमीचा विचार न करता, २२ खेळांमध्ये प्रशिक्षण तसेच उपकरणे, वैद्यकीय सेवा आणि मासिक खर्चासाठी वार्षिक ६,२८,४०० रुपये दिले जात आहेत.***

***मल्लखांब, कलारीपयट्टू, गटका, थांगता, योगासन आणि सिलंबम हे खेलो इंडियामधील देशी आणि पारंपरिक खेळ आहेत.***

### खेळासंदर्भात आणखी काही योजना

**टॉप्स घडवत आहे ऑलिम्पिक पदक विजेते खेळाडू**

टार्गेट ऑलिम्पिक पोडियम स्कीम (टॉप्स) २०१४ पासून लागू करण्यात आली आहे. ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिक खेळांमध्ये भारताची पदक मिळवण्याची शक्यता वाढवणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. ही योजना उत्कृष्ट क्षमता असलेल्या खेळाडूंना ओळखून त्यांना त्यांच्या गरजेनुसार संपूर्ण सहाय्य पुरवते. या योजनेंतर्गत टॉप्स कोअर खेळाडूंना दरमहा ५० हजार रुपये आणि टॉप्स डेव्हलपमेंट खेळाडूंना स्वखर्चासाठी २५ हजार रुपये भत्ता दिला जातो. यासोबतच प्रशिक्षण, क्रीडा विज्ञान आणि सहाय्यक सेवा यासारख्या विविध सहाय्य सेवाही पुरवल्या जातात.

## टॉप्सअंतर्गत दिली जाणारी मदत

**५१ कोअर खेळाडू**
**५२ पॅरा कोअर खेळाडू**
**१३० डेव्हलपमेंट खेळाडू**



क्षेत्रात अधिक उंचीवर नेऊ शकतील, अशा तरुण खेळाडूंची एक मजबूत फळी तयार होत आहे. २०३६ सालापर्यंत भारताला जगातील अव्वल १० क्रीडा राष्ट्रांमध्ये आणि २०४७ पर्यंत अव्वल ५ राष्ट्रांमध्ये स्थान मिळवून देण्यासाठी खेळाडूंचा एक आश्वासक आणि सातत्यपूर्ण गट तयार करणे, हे कीर्तीचे ध्येय आहे. ■

# रखडलेल्या शासकीय प्रकल्पांना गती देणारा प्रगती मंच

> २०१४ नंतर आणखी एक महत्त्वाचा बदल झाला आहे, तो म्हणजे वर्षानुवर्षे अडकलेले-रखडलेले-लटकलेले प्रकल्प शोधून काढून मिशन मोडवर पूर्ण केले जात आहेत. अर्धवट पूर्ण झालेले प्रकल्प केवळ आपल्या देशातील प्रामाणिक करदात्यांच्या पैशांचा अपव्ययच करत नाहीत तर खर्च वाढवतात आणि त्यांना मिळायला हवे असलेले फायदे नाकारतात. हा आपल्या करदात्यांवर होणारा मोठा अन्याय आहे.

### कोल्लम बायपास



- मंजुरी १९७२.
- केंद्र सरकारची अंतिम मंजुरी जानेवरी, २०१५.
- प्रकल्पाची लांबी एनएच-६६ वर १३ किमी.
- उद्घाटन १५ जानेवरी २०१९.
- खर्च ३५२ कोटी रुपये.

### प्रगती प्लॅटफॉर्म

- जवळजवळ चार दशकांपासून प्रलंबित असलेल्या या प्रकल्पातील परवानग्या आणि आर्थिक समस्यांसह सर्व अडथळे प्रगती प्लॅटफॉर्मने योग्य वेळी दूर केले.
- **लाभ:** दुहेरी मार्गिकेच्या बायपास प्रकल्पामुळे अलप्पुझा आणि तिरुअनंतपुरम दरम्यानचा प्रवास वेळ कमी झाला आहे. कोल्लम शहरातील वाहतूक कोंडी देखील कमी झाली आहे.

### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ



- प्रकल्पाला मंजुरी ६ जुलै २००७
- खर्च १९,६४६ कोटी
- प्रगतीवर आढावा २५ मार्च २०१५, २९ सप्टेंबर २०२१
- काम पूर्ण २५ डिसेंबर २०२५
- **लाभ:** महाराष्ट्रातील शेतकरी मध्य पूर्वेच्या सुपर मार्केटशी जोडले गेले

### जम्मू-उधमपूर-श्रीनगर बारामुल्ला रेल लिंक



उधमपूर–श्रीनगर–बारामुल्ला रेल लिंक (यूएसबी आरएल) हा प्रकल्प स्वतंत्र भारतातील सर्वात महत्त्वाकांक्षी रेल्वे प्रकल्पांपैकी एक आहे. हिमालयीन पर्वतरांगांमध्ये २७२ किलोमीटर लांब पसरलेल्या या प्रकल्पात ११९ किलोमीटर लांबीचे ३८ बोगदे आहेत. याशिवाय दऱ्या आणि पर्वतीय खिंडींना जोडणाऱ्या ९४३ पुलांचा समावेश आहे. या रेल्वेजाळ्याने जम्मू आणि काश्मीरसाठी गतिशीलता, व्यापार आणि पर्यटनातील नवीन अध्याय उघडला आहे.

- प्रकल्पाला मंजुरी ३१ मार्च १९९४.
- खर्च ४३,७८० कोटी.
- रेल्वेमार्गाची लांबी २७२ किलोमीटर.
- शुभारंभ ६ जून २०२५.
- वैशिष्ट्ये ३८ बोगदे (लांबी ११९ किमी), ९४३ पूल.
- प्रगतीवर आढावा २४ जून २०१५, ६ नोव्हेंबर २०१९ आणि ३० डिसेंबर २०२०.
- जगातील सर्वात उंच रेल्वे आर्च ब्रिज, ३५९ मीटर उंचीचा, चिनाब पुलावर बांधण्यात आला.
- काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत रेल्वे जोडणी.

## खुर्दा–बलांगीर नवीन ब्रॉड गेज रेल्वे लिंक



- मंजुरी ३१ मार्च १९९४.
- कामाची सुरुवात ८ मार्च २००१.
- लांबी ३०१ कि.मी.
- प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा ३० सप्टेंबर २०१५, २२ जानेवारी २०२०.
- पूर्णत्वाला नेण्याचे उद्दिष्ट ३१ डिसेंबर २०२६.
- खर्च ५,०८९ कोटी.
- **लाभ:** स्थानिक व्यापार, तसेच भुवनेश्वर ते बलांगीर दरम्यानचे अंतर कमी होणार.
- **अडथळे:** वनविभागाची मंजुरी/भूसंपादन.
- या रेल्वे मार्गावरील सर्व ७ बोगद्यांचे बांधकाम पूर्ण.

## आगरतळा–सब्रूम नवीन रेल्वे मार्ग



- पायाभरणी ऑक्टोबर २००८.
- प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा २४ जून २०१५.
- **खर्च:** ५,१३८.५१ कोटी.
- **अडथळे:** वने, वन्यजीव, पर्यावरण.
- काम सुरू झाल्याची तारीख २९ जुलै २००९
- उद्घाटन ऑक्टोबर २०१९
- **लाभ:** अन्नधान्य आणि इंधनासारख्या जीवनावश्यक वस्तूंच्या वाहतूकीचा खर्च कमी झाला. यामुळे त्रिपुराच्या बाजारपेठांमध्ये होणारा पुरवठा विला अडथळे सुरू राहिला, तसेच वस्तूमालाच्या किमतींमध्ये स्थैर्य आहे.

## सीवूड–बेलापूर–उरण मार्ग



- मंजुरी ११ जुलै १९९७.
- प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा २२ फेब्रुवारी २०१७.
- खर्च २,९८०.४१ कोटी.
- काम पूर्ण झाल्याची तारीख ११ मार्च २०२३.

● **लाभ:** बेलापूर–उरण रेल्वे मार्ग हा धोरणात्मदृष्ट्या महत्वाचा उपनगरीय रेल्वे पायाभूत सुविधा प्रकल्प आहे, जो नवी मुंबईच्या सुनियोजित विकासाला प्रोत्साहन देण्याकरीता तयार करण्यात आला.

● **अडथळे:** वन, वन्यजीव, पर्यावरण.

### हरिदासपूर–पारादीप नवीन रेल्वे मार्ग



● मंजुरी १ जानेवारी १९९७.

● प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा २९ ऑगस्ट २०१८.

● **अडथळे:** भूसंपादन आणि इतर काही अन्य बाबी.

● खर्च ११,१८६ कोटी.

● काम पूर्ण झाल्याची तारीख ३१ जुलै २०२०.

● **लाभ:** पारादीप बंदरापासून रेल्वेचे अंतर ४० किलोमीटरने कमी झाले. मालवाहतूक हाताळणीची क्षमता २५ ते ३० टक्क्यांनी वाढली. दररोज २० ते २५ अतिरिक्त मालवाहतूक गाड्यांची सुविधा उपलब्ध झाली.

### हैदराबाद मेट्रो (७२ किमी)



● मंजुरी २०१२.

● प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा ३१ डिसेंबर २०१५.

● खर्च १८,९७५ कोटी.

● काम पूर्ण झाल्याची तारीख ७ फेब्रुवारी २०२०.

● **अडथळे:** वीज दरासह इतर आर्थिक अडचणी.

● **लाभ:** पीपीपी तत्वाअंतर्गत राबवला गेलेला हा जगातील सर्वात मोठा मेट्रो रेल्वे प्रकल्प आहे. या प्रकल्पाअंतर्गत मल्टीमॉडेल ट्रान्सपोर्टचे एकात्मिकीकरण तसेच मोठ्या प्रमाणावर ट्रांजिट–ओरिएंटेड विकासकामांचा समावेश आहे. यामुळे शहरी वातहूक तसेच आर्थिक विकासावर सकारात्मक परिणाम घडून आला आहे.

### अहमदाबाद मेट्रो रेल्वे (टप्पा–१)



● मंजुरी १७ नोव्हेंबर २०१४.

● खर्च १२,९२४.५ कोटी.

● प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा २५ एप्रिल २०१८, ३० डिसेंबर २०२०.

● काम पूर्ण झाल्याची तारीख जानेवारी २०२६.

● **अडथळे:** आर्थिक समस्या, भूसंपादन.

● **लाभ:** प्रवासाच्या वेळेत बचत झाली, त्यासोबतच इंधनाच्या वापरातही घट झाली. हवेच्या गुणवत्तेत सुधारणा झाली तसेच वाहतुकीच्या सुरक्षेसोबतच रस्त्यांवरील गर्दीचे प्रमाण कमी झाले.

### दिल्ली एमआरटीएस टप्पा – ३

● मंजुरी २६ डिसेंबर २०११.

● प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा २७ मे २०१५.



● खर्च ३८,८५८ कोटी.

● काम पूर्ण झाल्याची तारीख ६ ऑगस्ट २०२२.

● **लाभ:** मेट्राचे दळणवळीय जाळे अधिक बळकट झाले. दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातल्या नागरिकांच्या प्रवासात सुलभता आली.

● **अडथळे:** भूसंपादन, खर्चातील हिस्सा आणि बांधकामाशी संबंधित बाबी

## गाडरवारा सुपर थर्मल पॉवर



● मंजुरी २००८.

● पायाभरणी.

● प्रकल्पामध्ये ८०० मेगावॅट क्षमतेचे दोन केंद्र.

● राष्ट्राला समर्पित २०२५.

● विलंबाचे कारण जमीन, इंधन पुरवठा जोडणीशी संबंधित बाबी आणि कार्यान्वयाशी संबंधित अडचणी.

● **लाभ:** मध्य प्रदेशसह इतर पश्चिमेकडील राज्यांना विना अडथळा वीजपुरवठ्याची सुनिश्चिती झाली.

● प्रगती या व्यासपीठाअंतर्गतच्या आढाव्यानंतर प्रकल्पाच्या कामाला गती मिळाली.

● एनपीसीच्या अखत्यारितील हा प्रकल्प मध्य प्रदेशातील नरसिंगपूर जिल्ह्यात आहे.

## कुडगी–१ सुपर थर्मल पॉवर प्रकल्प, ३X८०० मेगावॅट, एनटीपीसी



● मंजुरी १ मार्च २०१२.

● प्रगती या व्यासपीठाअंतर्गतच्या आढावा २४ जून २०१५.

● खर्च १८,३८२ कोटी.

● काम पूर्ण झाल्याची तारीख ३ डिसेंबर २०१८.

● **लाभ:** दक्षिण भारतातील औद्योगिक क्षेत्रांना वीजपुरवठा तसेच दक्षिणेकडील वीजपुरवठा व्यवस्थेत स्थैर्य.

● **अडथळे:** भूसंपादन, वापराचे हक्क

## सोलापूर सुपर थर्मल पॉवर स्टेशन



● मंजुरी १ मार्च २०१२.

● प्रगती या व्यासपीठाअंतर्गतच्या आढावा ३० डिसेंबर २०१५.

● खर्च ११,४०६ कोटी.

● काम पूर्ण झाल्याची तारीख २९ मार्च २०१९.

● **लाभ:** सोलापूर सुपर औष्णिक विद्युत स्टेशनमुळे विश्वासार्ह वीजपुरवठ्याची सुनिश्चिती झाली. यामुळे ऊर्जा सुरक्षेलाही बळकटी मिळाली तसेच स्थानिक पातळीवर आर्थिक विकासाला पाठबळ मिळाले. यातून या क्षेत्रात सामाजिक–आर्थिक मूल्यात वृद्धी घडून आली.

● **अडथळे:** वापराचे हक्क/रस्त्याचे हक्क, वीज, इंधन आणि भूसंपादन.

### कामेंग जलविद्युत



- मंजुरी नोव्हेंबर.
- प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा २४ जून २०१५.
- **अडथळे:** भूसंपादन, वने, वन्यजीव आणि पर्यावरण.
- खर्च ८,४५८.९५ कोटी.
- काम पूर्ण झाल्याची तारीख १० फेब्रुवारी २०२१.
- **लाभ:** कामेंग जलविद्युत प्रकल्पामुळे अरुणाचल प्रदेश हे देशातले अतिरिक्त विद्युत निर्मिती करणारे राज्य बनले आहे. इतकेच नाही तर अरुणाचल प्रदेश हे प्रादेशिक तसेच राष्ट्रीय वीजपुरवठा व्यवस्थेला देखील अतिरिक्त वीजपुरवठा करू लागले.

### पारे जल विद्युत (११० मेगावॅट), नीपको लिमिटेड

- मंजुरी २६ नोव्हेंबर २००८.
- प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा २७ डिसेंबर २०१५.
- **अडथळे:** वने, वन्यजीव, पर्यावरण आणि राईट ऑफ वे शी संबंधित अडचणी.
- खर्च १६५६.७४ कोटी.
- काम पूर्ण झाल्याची तारीख २४ मे २०१८.
- **लाभ:** ईशान्य भारतातील सेव्हन सिस्टर्स राज्यांच्या जलविद्युत क्षमतेत मोठे परिवर्तन घडून आले. स्वच्छ ऊर्जेच्या माध्यमातून भारताचे मोठे उद्दिष्ट पूर्ण करण्यात मदत होऊ लागली आहे.

### जयपूर-सीकर-चुरू गेज कनव्हर्जन

- मंजुरी २००८-२००९.
- प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा २८ सप्टेंबर २०१६.
- **अडथळे:** वन, वन्यजीव, पर्यावरण.
- खर्च १,२२२ कोटी.
- काम पूर्ण झाल्याची तारीख २५ एप्रिल २०१९.
- **लाभ:** या प्रकल्पामुळे १,५०० मीटर लांबीच्या गाड्या चालवणे शक्य झाले आहे. मालवाहतूक क्षमतेमध्ये ५,००० मेट्रिक टन प्रति गाडीवरून सुमारे १३,००० मेट्रिक टन वाढ झाली.


### जबलपूर-गोंदिया २८५ किलोमीटर गेज परिवर्तन



- मंजुरी १७ जानेवारी २००३.
- प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा २३ मार्च २०१६.
- **अडथळे:** भूसंपादन, वने, वन्यजीव आणि पर्यावरणीय मंजुरीशी संबंधित अडचणी.
- खर्च १,९९०.९८ कोटी.
- काम पूर्ण झाल्याची तारीख २१ मार्च २०२१.
- **लाभ:** या प्रकल्पामुळे जबलपूरहून मोठ्या मेट्रो शहरांमध्ये होणारी मालवाहतूक तसेच प्रवासी वाहतूक आता वाहतुकीचे साधन न बदलता करता येऊ लागली आहे. यामुळे प्रवासाच्या वेळेत तसेच व्यावसायिक वाहतुकीच्या खर्चातही घट साध्य झाली आहे. या प्रकल्पामुळे मध्य प्रदेशच्या पूर्वेकडील भागांमधील आदिवासी आणि वन क्षेत्रांमधील लोकांना बाजारपेठा, आरोग्य, शिक्षण आणि जिल्हा केंद्रांपर्यंत पोहचवण्यासाची सुलभ व्यवस्था उपलब्ध झाली आहे.

### २.५ एमएमटी पादुर धोरणात्मक कच्चे तेल साठवणूक

- मंजुरी ७ जानेवारी २००४.
- प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा २२ एप्रिल २०१५, २३ मार्च २०१६.



● **अडथळे:** राईट टू यूज आणि राईट ऑफ वे शी संबंधित अडचणी.

● खर्च ७,५८१ कोटी.

● काम पूर्ण झाल्याची तारीख ३१ डिसेंबर २०१८.

● **लाभ:** पादुर एसपीआर प्रकल्प कार्यान्वित झाल्यामुळे सामाजिक-आर्थिक लाभ मिळू लागले. यासोबतच हा प्रकल्प धोरणात्मकदृष्ट्याही तितकाच महत्त्वाचा ठरला आहे. या प्रकल्पामुळे कच्च्या तेलाच्या पुरवठ्यात व्यत्यय आला तर त्यातून, तसेच आप्तकालीन परिस्थितीतून मार्ग काढण्याची भारताची क्षमता वाढली आहे.

## कुडनकुलम-एपीपी पारेषण प्रणाली



● मंजुरी १२ मे २००५.

● प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा ४ नोव्हेंबर २०१५.

● अडथळे: राइट ऑफ वे तसेच राईट ऑफ यूजशी संबंधित इतर अडचणी.

● खर्च २,५७७.२३ कोटी.

● काम पूर्ण झाल्याची तारीख ३१ डिसेंबर २०१९.

● लाभ: या प्रकल्पामुळे स्वछ अणुऊर्जेला चालना मिळाली, या माध्यमातून वीजपुरवठा व्यवस्थेची विश्वासार्हता तसेच ऊर्जा सुरक्षेत सुधारणा घडून आली. महागडी वीज खरेदी करावी लागण्याचे प्रमाण कमी झाले. कार्बन उत्सर्जनात घट साध्य करण्याच्या भारताच्या ध्येय-उद्दिष्टांनाही पाठबळ मिळाले. यासोबतच स्थानिक पातळीवर आर्थिक विकासाला चालना मिळाली आणि त्यामुळे समुदायांमधील विश्वासार्हताही वाढली.

## बेंबळा सिंचन



● मंजुरी २ एप्रिल २००७.

● प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा २५ ऑक्टोबर २०२३.

● अडथळे: भूसंपादन आणि आर्थिक अडचणी.

● खर्च २,६८५.४१ कोटी.

● काम पूर्ण झाल्याची तारीख ३० जून २०२५.

● लाभ: याप्रकल्पामुळे दुष्काळग्रस्त भागांमधील शेती संबंधिची अनिश्चितता संपुष्टात आली. पिक क्षेत्राचे प्रमाण विस्तारले आणि पावसावरील अवलंबनही कमी झाले.

**(समाप्त)**

# राजकारणातील संत



**माजी** खासदार डॉ. गोपाळराव पाटील म्हणजे लातूरकरांचे आवडते आप्पा यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या हसऱ्या चेहऱ्यावर सतत आनंद ओसंडून वाहायचा. विद्वान- अभ्यासू आप्पाच्या चेहऱ्यावर विद्वतेचा अंहकार कधीच दिसायचा नाही. ते निष्णात बालरोग तज्ज्ञ होते. आपल्या भावना व्यक्त न करू शकणाऱ्या हजारो बालकांच्या भावना जाणून आप्पांनी त्यांच्यावर उपचार करून त्यांना बरे केले होते. म्हणून की काय त्यांच्या चेहऱ्यावर सतत लहान मुलांची निरागसता दिसत असे. एखाद्या पटलेल्या गोष्टीला खळखळून हसून दाद देणारे आप्पा आणि न पटलेल्या गोष्टीबद्दल स्पष्ट नाराजी व्यक्त करणारे गोपाळराव हे एक असामान्य व्यक्तीमत्व होते. ज्या काळात भाजपमध्ये काम करायला कोणी धजत नव्हते त्या काळात गोपीनाथ मुंडे-प्रमोद महाजनांच्या विंनतीवरून डॉ. गोपाळराव पाटील यांनी १९९१ मध्ये भाजपात प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी मागे वळून कधीच पाहिले नाही. केवळ लातूर जिल्ह्यातच नाही तर मराठवाड्यात भाजपाचा विस्तार करण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांनी १९६५ साली लातूर येथे बालरोगतज्ज्ञ म्हणून कामास सुरूवात केली. अत्यंत संवेदनशील मनाच्या डॉ. गोपाळरावांनी लहान मुलांची मनोभावे सेवा केली. ग्रामीण भागातून आलेल्या अनेक गरीबांकडून त्यांनी कधीही उपचाराचे पैसे घेतले नव्हते. मुरूड भागात १२ वर्षे त्यांनी रूग्णांची विनामूल्य सेवा केली. त्यांच्या या सेवा भावामुळे लोक त्यांना देवमाणूस म्हणत.

डॉ. पाटील यांच्या समाजकार्याचा लौकीक पाहून शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी त्यांची सर्वानुमते निवड झाली. तिथेही आप्पांनी गुणवत्ता, पारदर्शकता आणि शिस्तीच्या जोरावर राजर्षी शाहू महाविद्यालयास राष्ट्रीय पातळीवर लौकिक मिळवून दिला. त्यांनी गुणवत्तेशी कधीच तडजोड केली नाही. आणि संस्थेचे अध्यक्ष म्हणून कधी रूबाबही दाखविला नाही. त्यांच्या पुण्याईमुळेच लातूरमध्ये पन्नास हजार बाहेरील विद्यार्थी शिक्षणासाठी येतात व हजारो विद्यार्थी अभियांत्रिकी व वैद्यकीय क्षेत्रात यश संपादन करत आहेत.


१२ वर्षे मुरूड भागात मोफत वैद्यकीय सेवा करुनच आप्पा थांबले नाही तर त्यांनी लातूर येथे भालचंद्र ब्लड बँक उदगीर येथे उदयगिरी रुग्णालय सुरू करुन रुग्णाच्या सेवेचे व्रत चालूच ठेवले. राजकारणात प्रामाणिक लोक सापडत नाहीत असे म्हटले जाते. मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू व फ्रेंच भाषा त्यांना अवगत होत्या. त्यामुळे त्यांचे वाचन अफाट होते. ते मनाने हळवे असले तरी शिस्तीच्या बाबतीत अत्यंत कठोर होते. त्यांच्या कठोर शिस्तीमुळेच शाहू कॉलेजला राष्ट्रीय कीर्ती मिळाली. त्यांचे ज्ञान पाहून भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी त्यांना 'नॉलेज कार्पोरेशन' असे म्हणत. शिवराज पाटीलांसारख्या दिग्गज नेत्याच्या विरोधात आप्पा चार वेळा लोकसभा लढले. यश आले नाही म्हणून आप्पांनी पक्षाचे काम कधीच सोडले नाही. पक्षाच्या लहानसहान बैठकांना ते आवर्जुन उपस्थित राहायचे. त्यांची पक्षनिष्ठा लक्षात घेऊन पक्षाने त्यांना राज्यसभेवर खासदार म्हणून पाठविले.

आप्पा राजकारणातील संत होते. त्यांच्या प्रामाणिकतेचा एक किस्सा मला गोपीनाथ मुंडे साहेबांनी सांगितला होता. आप्पा १९९८ साली लोकसभा हरले. निकालानंतर मुंडे साहेबांना भेटून त्यांनी मुंडे साहेबांचे आभार मानले आणि एक विंनती केली. ''आपण मला निवडणुकीसाठी जी आर्थिक मदत केली होती त्यातील काही रक्कम उरली आहे ती मी आपणास परत करायला आलो आहे.'' निवडणूक जिंकल्यानंतरही लोकांचे देणे आहे म्हणून आर्थिक मदत मागायला आलेल्या अनेक कार्यकर्त्यांना हा किस्सा मुंडे साहेब सांगत. तेव्हा निवडून आलेले आमदार खजिल होऊन परत जात. अशा या राजकारणातील संताने आपल्या प्रामाणिकपणाचा आदर्श मागे ठेवून कायमचा निरोप घेतला.

**डॉ. गोपाळराव पाटील उर्फ आप्पांना भाजपा प्रदेश व 'मनोगत' पाक्षिक तर्फे भावपूर्ण श्रध्दांजली!**

**- गणेश हाके, प्रदेश प्रवक्ते**

## मुंबईतील ज्येष्ठ कार्यकर्ते दिलीप गोडांबे यांचे निधन



**जनसंघापासून** सक्रिय असणारे मुंबईतील भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते दिलीप गोडांबे यांच्या निधनाची बातमी नुकतीच समजली. दिलीप गोडांबे यांच्या मुंबईतील निवास आणि कार्यक्षेत्र परिसरात राजकीयदृष्ट्या शिवसेनेचे प्राबल्य होते. मुंबईतील तत्कालीन वातावरणात ते शिवसेनेत उडी मारू शकले असते. कार्यकर्ता वृत्ती आणि चळवळ्या स्वभाव, धडपडण्याची मानसिकता आणि त्यातून निर्माण होणाऱ्या अस्वस्थतेतून थेट कृती याआधारे त्यावेळी ते शक्य होते. मात्र जनसंघाची पणती हाती घेऊन राष्ट्रीय भूमिकेतून काम सुरू केले. भाजपात सक्रिय राहिले. जिल्हा अध्यक्षासह विविध पदावर काम केले. मुंबईत भाजपाचा महापौर याचा आनंद वाटणाऱ्या जुन्या कार्यकर्त्यातील दिलीप गोडांबे होते. पक्षाच्या प्रतिकुल काळात निष्ठा ठेवून आणि विचाराची प्रतिष्ठा जपून काम करणाऱ्या मुंबईतील राजकीय कार्यकर्त्यांच्या परंपरेतील दिलीप गोडांबे गेले. प्रशिक्षण वर्गातून अश्या स्थानिक कार्यकर्त्यांचे स्मरण आणि त्यांनी यथाशक्ती पक्ष विस्तार करताना, मूळ वैचारिक भूमिकेच्या स्विकृतीसाठी केलेल्या प्रयत्नांची नोंद घेणे उपयुक्त ठरेल. आणिबाणीत सरकारविरोधी लढ्यात सक्रिय भूमिका बजावणाऱ्या गोडांबे यांनी पक्षाकडून कसलीच अपेक्षा ठेवली नव्हती. पक्षाच्या अत्यंत प्रतिकूल काळातही निष्ठेने काम करणाऱ्या मोजक्या कार्यकर्त्यांमध्ये गोडांबे यांचा समावेश होता. पक्षासाठी आपले सर्वकाही देणाऱ्या गोडांबे यांच्यासारख्या कार्यकर्त्यांमुळेच पक्षाची वाढ झाली. ■

## माजी आमदार बळीराम पाटील-कोटकर यांचे निधन



हिंगोली जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीची पाळेमुळे मजबूत करण्यासाठी अविश्रांत मेहनत घेतलेल्या माजी आमदार बळीराम पाटील –कोटकर यांचे नुकतेच निधन झाले. हिंगोलीचे बापू म्हणून ओळखले जाणारे बळीराम कोटकर हे सर्वसामान्य कार्यकर्त्यांशी आणि जनतेशी नाळ जुळलेले व्यक्तिमत्व होते. त्यांना राजकारणाची कोणतीही कौटुंबिक पार्श्वभूमी नव्हती. गोपीनाथ मुंडे यांच्या संपर्कात आल्यानंतर त्यांना भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. १९९० मध्ये त्यांना हिंगोली विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पार्टीची उमेदवारी देण्यात आली. काँग्रेसच्या साहेबराव पाटील–गोरेगावकर या जाणत्या नेत्याचा पराभव करून बळीराम पाटील विधानसभेत निवडून गेले. १९९५ मध्येही त्यांनी हिंगोली मतदारसंघातून विजय मिळवला. हिंगोली जिल्ह्याच्या निर्मितीसाठी त्यांनी मोठे योगदान दिले. विधानसभेच्या आश्वासन समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले. ■

## मालेगांव येथील ज्येष्ठ कार्यकर्ते बालेभाई मन्सूरी यांचे निधन



**जनसंघ** ते भाजपाचे मालेगांव तत्कालीन मंडळ पदाधिकारी, आदरणीय कै. प्रल्हाद शर्मा, कै. झुंबरलाल लोढा, कै.रतन कनोज, ह्यांच्या पिढीतील पक्षनिष्ठ कार्यकर्ते बालेभाई मन्सूरी यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. मुस्लिम समाजाचे असूनही भाजपासाठी घरावर तुळशीपत्रं वाहणारे मन्सूरी हे आदर्श कार्यकर्ते होते. भारतीय जनता पार्टीसाठी काम करणाऱ्या मन्सूरी यांना समाजातून मोठ्या विरोधाला सामोरे जावे लागले. मात्र मन्सूरी यांनी त्याची पर्वा केली नाही. आपण केलेल्या कामाचे त्यांनी भांडवलही केले नाही. १९९० च्या दशकात भाजपासाठी प्रतिकूल परिस्थितीत अक्षरशः ठाम भूमिका घेत मुस्लिम समाजाचा रोष त्या कालावधीत ओढवून घेतला होता. दिवंगत बालेभाई मन्सूरी यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**– संजय विजय कन्नल**

# दिल्ली-डेहराडून द्रुतगती मार्गाचे उद्‌घाटन

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी दिल्ली-डेहराडून आर्थिक मार्गिकेचे नुकतेच उद्‌घाटन केले. उत्तराखंड आणि विस्तारित क्षेत्राच्या विकासात हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. डेहराडून इथे आयोजित या कार्यक्रमात पंतप्रधानांनी बैसाखी, बोहाग बिहू आणि पुथांडू या सणांच्या निमित्ताने देशवासीयांना शुभेच्छा दिल्या. देशभरात सध्या सणांचा उत्साह आणि आनंदाचे वातावरण असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. देवभूमीच्या पवित्र भूमीला पंतप्रधानांनी वंदन केले. यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ आणि बद्रीनाथ यांचा समावेश असलेली 'चार धाम यात्रा' येत्या काही दिवसांत सुरू होणार असून हा असा एक क्षण आहे, ज्याची देशभरातील लक्षावधी भाविक अत्यंत श्रद्धेने वाट पाहतात.

**हा द्रुतगती महामार्ग प्रवाशांसाठी प्रवासाच्या वेळेत तसेच खर्चात मोठी बचत करणारा असून त्याद्वारे लक्षणीय प्रमाणात इंधनाची बचत तसेच कमी खर्चात मालवाहतूक शक्य होईल. या प्रकल्पातील बांधकामासाठी याआधीच १२,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली.**

शेतकरी तसेच पशुपालकांची उत्पादने अधिक वेगाने मोठ्या बाजारांपर्यंत पोहोचू शकल्यामुळे त्यांना देखील या प्रकल्पाचा फायदा मिळणार आहे. एखाद्या राष्ट्राचे भविष्य हे त्या देशातील रस्ते, महामार्ग, द्रुतगती मार्ग, हवाई मार्ग, रेल्वे मार्ग आणि जलमार्गांमध्येच लिहिले गेलेले असते, असे प्रतिपादन पंतप्रधानांनी यावेळी केले. वर्ष २०१४ पूर्वी पायाभूत सुविधांवरील खर्च दरवर्षी २ लाख कोटी रुपयांपेक्षा कमी होता, तो आता सहा पटींहून अधिक वाढून वर्षाला १२ लाख कोटी रुपयांहून अधिकवर पोहोचल्याचे सांगत, त्यांनी, देशात पायाभूत सुविधांच्या विकासाला मिळालेल्या अभूतपूर्व गतीकडे लक्ष वेधले. केवळ उत्तराखंडमध्येच सध्या २.२५ लाख कोटी रुपयांहून अधिक खर्चाचे पायाभूत सुविधा प्रकल्प प्रगतीपथावर आहेत, असे पंतप्रधानांनी सांगितले. ■

### दिल्ली-डेहराडून द्रुतगती मार्गाची प्रमुख वैशिष्ट्ये

**दिल्ली ते डेहराडून दरम्यानचा प्रवास २.५ ते ३ तासांवर** (पूर्वीचा ६-७ तास) आणणारा, २१०-२१३ किमी लांबीचा ६-लेनचा (८-लेनपर्यंत विस्तारित) आधुनिक महामार्ग आहे. हा मार्ग बागपत, शामली, मुझफ्फरनगर आणि सहारनपूर मार्गे जातो.

**जलद कनेक्टिव्हिटी :** दिल्ली (अक्षरधाम) ते डेहराडून प्रवासाचा वेळ केवळ २.५ ते ३ तासांवर आला आहे.

**अंतर कमी :** सध्याच्या २५० किमी अंतरावरून ते सुमारे २१० किमी पर्यंत कमी झाले आहे.

**आशियातील सर्वात लांब वन्यजीव कॉरिडॉर :** वन्यजीवांच्या सुरक्षित हालचालीसाठी राजाजी नॅशनल पार्कमधून जाणारा १२ किमीचा उन्नत (Elevated) कॉरिडॉर या महामार्ग प्रकल्पाअंतर्गत तयार करण्यात आला आहे. आशियातील सर्वात मोठा असा हा कॉरिडॉर आहे.

**पर्यावरणस्नेही रचना :** दात काली येथे ३४० मीटरचा बोगदा आणि प्राण्यांसाठी अनेक अंडरपास आहेत. संपूर्ण मार्ग ६-लेनचा असून आवश्यकतेनुसार ८-लेनपर्यंत विस्तारित केला जाऊ शकतो.



डेहराडून-दिल्ली आर्थिक मार्गिका संपूर्ण क्षेत्राचा कायापालट घडवेल, या मार्गिकेमुळे वेळेची बचत होईल, प्रवास अधिक स्वस्त आणि वेगवान होईल; लोकांना पेट्रोल आणि डिझेलवर कमी खर्च करावा लागेल, तसेच प्रवासी भाडे आणि मालवाहतुकीचा खर्चही कमी होईल. याशिवाय, यामुळे रोजगाराच्या संधीही निर्माण होतील. **- पंतप्रधान नरेंद्र मोदी**

## केंद्र सरकारची अतिरिक्त 25 लाख मेट्रिक टन गव्हाच्या निर्यातीला मंजुरी

**केंद्र** सरकारने अतिरिक्त २५ लाख मेट्रिक टन गहू निर्यातीला मंजुरी दिली आहे. गव्हाचे सध्याचे उत्पादन, साठ्याची उपलब्धता आणि दरांचे कल यांचा सर्वसमावेशक आढावा घेतल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. रब्बी २०२६ हंगामात गव्हाखालील क्षेत्र गेल्या वर्षीच्या ३२८.०४ लाख हेक्टरच्या तुलनेत वाढून सुमारे ३३४.१७ लाख हेक्टर झाले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा गव्हाचे विक्रमी उत्पादन होण्याची शक्यता आहे. कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाने १० मार्च २०२६ रोजी जाहीर केलेल्या दुसऱ्या आगाऊ अंदाजानुसार आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी गव्हाचे उत्पादन १२०२ लाख मेट्रिक टन इतके अपेक्षित आहे.

उत्पादनाचा समाधानकारक दृष्टिकोन आणि साठ्याची वाढीव उपलब्धता लक्षात घेता, अतिरिक्त निर्यातीला परवानगी देणे योग्य मानले गेले. यापूर्वी, अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाने जानेवारी २०२६ मध्ये ५ लाख मेट्रिक टन गहू उत्पादनांच्या निर्यातीला मंजुरी दिली होती. त्यानंतर फेब्रुवारी २०२६ मध्ये आणखी अतिरिक्त ५ लाख मेट्रिक टन गहू उत्पादने आणि २५ लाख मेट्रिक टन गव्हाच्या निर्यातीला परवानगी देण्यात आली होती. आताच्या ताज्या मंजुरीसह, एकूण ५० लाख मेट्रिक टन गहू आणि १० लाख मेट्रिक टन गहू उत्पादनांच्या निर्यातीला परवानगी देण्यात आली आहे. अतिरिक्त २५ लाख मेट्रिक टन गहू निर्यातीला परवानगी देण्याच्या या ताज्या निर्णयामुळे बाजारपेठेतील तरलतेमध्ये वाढ होण्याची, साठ्याचे कार्यक्षम व्यवस्थापन सुलभ होण्याची आणि शेतमालाची बाजारात आवक होत असलेल्या मुख्य हंगामात शेतकऱ्यांची अडवणूक किंवा अगतिक होऊन केल्या जाणाऱ्या विक्रीला आळा बसण्याची अपेक्षा आहे. या निर्णयामुळे देशाची अन्नसुरक्षा पूर्णपणे सुरक्षित राहील याची हमी देतानाच, देशांतर्गत किमती स्थिर ठेवण्यास आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासही मदत होईल. शेतकरी आणि ग्राहक या दोघांच्याही हिताचा समतोल राखण्यासाठी, तसेच कृषी क्षेत्रातील शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी मोजूनमापून आणि वेळेवर पावले उचलण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे. ■

## 'प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजने' ला मुदतवाढ

**देशातील** मत्स्यपालन क्षेत्राचा कायापालट करणाऱ्या आणि 'नील क्रांती'ला बळ देणाऱ्या 'प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजने'ला केंद्र सरकारने ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत तात्पुरती मुदतवाढ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्रासह देशातील लाखो मच्छिमार आणि मत्स्य व्यावसायिकांना मोठा आधार मिळाला असून, या कालावधीसाठी १,२५० कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीला प्रशासकीय मान्यताही देण्यात आली आहे. भारत सरकारच्या मत्स्यपालन मंत्रालयाचे सहायक आयुक्त जी. रामकृष्ण राव यांनी २२ एप्रिल २०२६ रोजी यासंदर्भातील अधिकृत आदेश जारी केले. 'पीएमएमएसवाय' योजनेचा दुसरा टप्पा सध्या मंजुरीच्या प्रक्रियेत आहे. १६ व्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार या दुसऱ्या टप्प्याला तांत्रिक मान्यता मिळेपर्यंत योजनेत खंड पडू नये, या उद्देशाने केंद्र सरकारने ही ६ महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १२ जून २०२० रोजी २०,०५० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे उद्दिष्ट ठेवून ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू केली होती.

### केंद्राची 'कडक' नियमावली

- सर्व आर्थिक व्यवहार केवळ पीएफएमएस आणि डीबीटी द्वारेच करणे बंधनकारक.
- संस्थांना खर्चाच्या नोंदीसाठी 'ईटी' मॉड्यूल वापरणे अनिवार्य असेल.
- डिजिटल स्वरूपात नसलेली उपयोगिता प्रमाणपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.
- मुदतवाढीच्या काळात खर्चाचे निकष १५ व्या वित्त आयोगाच्या नियमांनुसारच राहतील.

### रखडलेल्या प्रकल्पांना गती

- मुदतवाढीमुळे राज्यातील मत्स्यव्यवसाय विभागाला प्रलंबित कामांसाठी तातडीने निधी उपलब्ध होईल. महाराष्ट्रातील विस्तीर्ण सागरी किनारपट्टी आणि गोड्या पाण्यातील मत्स्यशेतीला या निर्णयामुळे मोठी उभारी मिळेल. केंद्राच्या आदेशाची प्रत राज्याच्या मत्स्यपालन आयुक्तांना (तारापोरवाला मत्स्यालय) प्राप्त झाली असून, अंमलबजावणीला वेग येणार आहे. ■

# मराठवाड्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पीक विमा योजनेची भरपाई



**ऑगस्ट** २०२५ मध्ये अतिवृष्टी झाली, नुकसान झाले, पण त्या संकटातही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस खंबीरपणे पाठीशी उभे राहिले. आता एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यापासून पीक विम्याची रक्कम थेट खात्यात जमा होत आहे. सोयाबीनसाठी हेक्टरी २८,००० रुपयांच्या वर रक्कम जमा होत आहे. हे यश आहे देवेंद्रजींच्या नियोजनाचे! जेव्हा जेव्हा राज्याचे नेतृत्व देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे राहिले आहे, तेव्हा तेव्हा शेतकऱ्यांना कधीही हात पसरण्याची वेळ आली नाही. त्यांनी नेहमीच भरभरून दिले आहे. दिलेला शब्द पाळणे आणि शेतकऱ्याला सन्मानाने जगवणे, हीच देवेंद्रजींची कार्यपद्धती आहे हे पुन्हा एकदा अधोरेखित केलं आहे. मराठवाड्यात शेतकऱ्यांची होल्डिंग क्षमता २ हेक्टर पेक्षा जास्त आहे. त्यामुळे ज्यांच्याकडे ३ हेक्टर पेक्षा जास्त सोयाबीनचा पेरा होता त्यांना ७५ हजारापेक्षा जास्त रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहे. ज्यांचा होल्डिंग २ एकर आहे त्यांना ५६ हजार रुपयांचा पीक विमा थेट शेतकऱ्यांच्या खात्यात येत आहे. नांदेड जिल्ह्यासह राज्यातील विविध भागांतील खरीप पिकांच्या नुकसानीपोटी शेतकऱ्यांना विम्याची रक्कम मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नैसर्गिक आपत्ती, पावसाचा खंड आणि कीड-रोगांमुळे बाधित झालेल्या पिकांचे पंचनामे पूर्ण झाल्यानंतर आता मदतीचे वाटप सुरू होत आहे. यंदाच्या खरीप हंगामात सोयाबीन हे राज्यातील प्रमुख पीक होते. ऐन काढणीच्या वेळी झालेल्या परतीच्या पावसामुळे सोयाबीनच्या उत्पादनात मोठी घट झाली. नांदेड जिल्ह्यात सोयाबीनचे क्षेत्र सर्वाधिक आहे. येथे पावसाने ओढ दिल्यामुळे सुरुवातीला पिकांची वाढ खुंटली.

**- प्रकाश गाडे**

# ठाणे-कल्याण-भिवंडी मेट्रो योजनेला मंजुरी

**राज्याच्या** पायाभूत सुविधांना वेग देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना हिरवा कंदील दाखवला. मंत्रालयात झालेल्या मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा विकास समितीच्या बैठकीत, मुंबई मेट्रो मार्गिका-५ अ (टप्पा १ आणि २) च्या १८,१३०.५५ कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे ठाणे, भिवंडी आणि कल्याण-उल्हासनगर परिसरातील प्रवाशांचा प्रवास अधिक वेगवान होणार आहे. मुख्यमंत्र्यांनी विदर्भातील कनेक्टिव्हिटी वाढवण्यासाठी नागपूर-गोंदिया, भंडारा-गडचिरोली आणि नागपूर-चंद्रपूर या तीन द्रुतगती महामार्गांच्या भूसंपादनासाठी 'हुडको'कडून कर्ज घेण्यासही मान्यता दिली. तसेच, नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या तयारीसाठी दुसऱ्या टप्प्यातील १०६३ कोटी रुपयांच्या विकासकामांनाही मंजुरी दिली. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्यासह मुख्य सचिव राजेश अग्रवाल उपस्थित होते. या प्रकल्पांसाठी केंद्र शासनाकडून आवश्यक परवानग्या मिळवण्याची कार्यवाही जलद गतीने करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

**६ वर्षांत महामार्ग पूर्ण करण्याचे लक्ष्य**

- प्रकल्पाचे वेळापत्रक, निविदा प्रक्रिया आणि पूर्णतेचा कालावधी त्वरित निश्चित करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश.
- भूसंपादनासाठी लागणारा निधी 'हुडको'कडून कर्ज स्वरूपात घेण्यासाठी वित्त विभागाशी समन्वय.

**प्रकल्पांची व्याप्ती आणि गुंतवणूक :**

- नागपूर-गोंदिया (१६२.५ कि.मी.): प्रकल्पाची एकूण किंमत १९,५८२ कोटी. भूसंपादनासाठी ३,१६२ कोटी मंजूर.
- नागपूर-चंद्रपूर (२०४.७ कि.मी.): भूसंपादनासाठी २,३५३ कोटीच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता.
- भंडारा-गडचिरोली (९४.२ कि.मी.): भूसंपादनासाठी १९३१ कोटींची तरतूद. ■

## राज्यात कार्यरत असलेल्या आरोग्यविषयक विविध योजनांचे एकत्रिकरण

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाच्या ऑनलाईन प्रणालीचे लोकार्पण

**मुख्यमंत्री** वैद्यकीय सहायता निधी कक्षाकरिता विकसित करण्यात आलेल्या ऑनलाईन प्रणालीचे नुकतेच लोकार्पण करण्यात आले. या ऑनलाईन प्रणालीमध्ये राज्यात कार्यरत असलेल्या आरोग्यविषयक विविध योजनांचे एकत्रिकरण करण्यात येणार असून त्यासाठी प्रथमच राज्यात वॉर रूम स्थापन केली जाणार आहे. त्यामुळे मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष केवळ आर्थिक मदतीचा स्रोत न राहता, रुग्ण, रुग्णालये व शासन यांना एकत्र आणणारे प्रभावी व्यासपीठ ठरेल. कर्करोगाच्या उपचारासाठी वापरली जाणारी इम्युनो थेरेपी अतिशय खर्चिक असते. या थेरेपीचे एक इंजेक्शन साधारणतः २ लाखांच्या घरात असून, उपचाराचा एकूण खर्च जवळपास ८ लाख असतो. या उपचारपद्धतीचा लाभ राज्यातील गरजू रुग्णांना देण्यासाठी नियोजन करावे. या योजनांच्या दुहेरी लाभांचे प्रकार टाळल्यास त्याचा खऱ्या गरजूंना जास्त प्रमाणात लाभ देता येईल. या उपक्रमामुळे दुहेरी लाभांचे प्रकार टाळता येतील.

### नवीन वेबसाईटची वैशिष्ट्ये

- **अर्ज स्थितीचे ट्रेकिंग :** यापुढे रूग्णांना अर्जाची माहिती त्यांच्या मोबाईलवर एसएमएस, लिंकद्वारे रिअल टाईम मिळणार.
- **टप्प्या-टप्प्याने निधी वितरण :** अर्जाच्या मंजुरीनंतर ३० टक्के रक्कम तात्काळ, उर्वरित ७० टक्के रक्कम अंतिम मंजुरीनंतर वर्ग केली जाणार.
- **रिअल-टाइम वॉर रूम मॉनिटरिंग :** मंत्रालय स्तरावर वॉर रूमद्वारे सतत देखरेख, निर्णय प्रक्रियेत गती.
- **तात्काळ मंजुरी (कार्यालयीन आठ तासांत मंजुरी):** उपचारासाठी लागणाऱ्या आर्थिक सहाय्याची मंजुरी केवळ कार्यालयीन आठ तासांत दिली जाते.
- **पूर्णपणे पेपरलेस प्रक्रिया :** कागदपत्रांची देवाणघेवाण किंवा कार्यालयीन धावपळीशिवाय डिजिटल पद्धतीने संपूर्ण प्रक्रिया पूर्ण.
- **रुग्णालयामार्फत थेट ऑनलाईन अर्ज :** रुग्णांना स्वतः अर्ज करण्याची गरज नाही रुग्णालयातूनच अर्ज सादर.
- **कागदपत्रांची ऑनलाईन पडताळणी:** आधार, उत्पन्न प्रमाणपत्र, शिधापत्रिका इ. तात्काळ डिजिटल पडताळणी.
- **थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) :** मंजूर निधी थेट रुग्णालयाच्या खात्यात जमा, पारदर्शकता वाढणार.
- **३००० पेक्षा अधिक रुग्णालयांचे जाळे :** राज्यातील सरकारी व खासगी मिळून ३०००+रुग्णालयांचा समावेश.
- **हेल्पलाईन व डिजिटल मार्गदर्शन :** टोल-फ्री १८०० १२३ २२११ व व्हॉट्सअपद्वारे मार्गदर्शन.
- **मोबाईल ॲपद्वारे रुग्णालय शोधता येणार :** योजनेमधील जवळील रुग्णालय, रक्तपेढी, रुग्णवाहिका सहज शोधण्याची सुविधा.
- एनजीओ व सीएसआर भागीदारी मॉडेल स्वयंसेवी संस्था व कॉर्पोरेट सीएसआर निधीद्वारे अधिक आर्थिक सहाय्य उपलब्ध.
- **त्रिपक्षीय करार प्रणाली :** रुग्णालय + सीएसआर संस्था + सीएमआरएफ यांच्यात विशिष्ट आजारासाठी करार खर्चाचा संयुक्त भार.
- **बेड मॅनेजमेंट व संसाधन पारदर्शकता :** धर्मादाय रुग्णालयांतील बेड उपलब्धता रिअल-टाइम पाहण्याची सुविधा.

लोकसहभाग वाढविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांसाठी स्वतंत्र ऑनलाईन पोर्टल विकसित करण्यात आले आहे. या माध्यमातून संस्था नोंदणी करून शासनासोबत भागीदारी करू शकतात. ■

# सौर कृषिपंप ठरताहेत शेतकऱ्यांना वरदान

## अहिल्यानगर उपविभागात सर्वाधिक पंप



**भारनियमनच्या** चिंतेतून शेतकऱ्यांना मुक्तता मिळावी आणि अपारंपरिक उर्जेचा कृषी सिंचन क्षेत्रात वापर व्हावा, या उद्देशाने राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी सौर कृषिपंप योजनेला प्रतिसाद मिळत आहे. महावितरणच्या नाशिक परिमंडलात १२ उपविभागांपैकी अहिल्यानगर ग्रामीण उपविभागात सर्वात जास्त १४ हजार ४७६ सौर कृषिपंप कार्यान्वित झाले आहेत. त्यामुळे कृषी सिंचनासाठी सर्वात जास्त सौरउर्जेचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांचा हा उपविभाग ठरला. तर, नाशिक जिल्ह्यात महावितरणचा नाशिक ग्रामीण हा उपविभाग या कामगिरीचा मानकरी ठरला आहे. विजेच्या मागणीचा वाढलेला आलेख आणि त्या तुलनेत कमी उत्पादनामुळे वीजपुरवठ्यात आलेली घट यामुळे कृषी सिंचनाला भारनियमनाचे चटके बसत होते.

भारनियमनाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढू लागल्याने शेतकऱ्यांना दिवसा कृषी सिंचन करणे अडचणीचे ठरू लागले होते. कृषी सिंचनाच्या प्रश्नातून शेतकऱ्यांना मुक्त करण्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री सौर कृषिपंप योजना ही मागेल त्याला सौर कृषिपंप या तत्त्वावर सुरू केली. या योजनेंतर्गत महावितरणतर्फे नाशिक परिमंडलातील नाशिक, मालेगाव आणि अहिल्यानगर या तीन मंडळात तीन वर्षांत आतापर्यंत ६२ हजार ८०१ सौर कृषिपंप कार्यान्वित झाले. त्यात नाशिक मंडळात १२ हजार ७५, मालेगाव मंडळात १३ हजार ४३४, अहिल्यानगर मंडळात ३७ हजार २९२ इतक्या शेतकऱ्यांनी सौर कृषिपंप बसवून कृषी सिंचनासाठी सौरउर्जेचा पर्याय निवडला. परिणामी या सर्व शेतकऱ्यांनी दिवसाच्या कृषी सिंचनाच्या चिंतेवर मात केली आहे.

**परिमंडल आणि विभागनिहाय पंपांची संख्या**

| | |
|---|---|
| अहिल्यानगर ग्रामीण | १४,४७६ |
| अहिल्यानगर शहर | ५,०१९ |
| कर्जत | १०,२०० |
| संगमनेर | ४,१८२ |
| श्रीरामपूर ग्रामीण | ३,४१५ |
| मालेगाव शहर | २,२२३ |
| कळवण | ४,७२३ |
| मनमाड ग्रामीण | ५,४७० |
| सटाणा | १,०१८ |
| चांदवड | २,७८६ |
| नाशिक शहर | १,०५६ |
| नाशिक ग्रामीण | ८,२३३ |
| नाशिक परिमंडळ | ६२,८०१ |

नाशिक परिमंडलातील १२ उपविभागांत सटाणा, नाशिक शहर आणि मालेगाव शहर या तीन उपविभागांतून सौर कृषिपंपांची संख्या अद्यापही सर्वांत कमी आहे. ■

# महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त भाजयुमो मुंबईतर्फे 'कामगार सन्मान कार्यक्रम'









महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्ताने भारतीय जनता युवा मोर्चा, मुंबईतर्फे संपूर्ण मुंबईत १५० हून अधिक ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत कामगार सन्मान कार्यक्रम तसेच सामूहिक महाराष्ट्र गीत सादर करून कामगारांच्या योगदानाला मानाचा मुजरा देण्यात आला आणि महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा गौरव करण्यात आला. हे सर्व कार्यक्रम भाजपा मुंबई अध्यक्ष आ. अमित साटम यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजयुमो मुंबई अध्यक्ष दीपक सिंह यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे पार पडले. या उपक्रमांमध्ये भाजयुमो मुंबई, जिल्हा, मंडळ व वॉर्ड स्तरावरील शेकडो कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विविध ठिकाणी कामगार बांधवांचा पुष्पगुच्छ, शाल व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच अनेक ठिकाणी जय जय महाराष्ट्र माझा या प्रेरणादायी महाराष्ट्र गीताच्या सामूहिक गायनाने वातावरण देशभक्ती व अभिमानाने भारावून गेले.






सावंतवाडी–कणकवली– मतदार यादी दुरुस्ती अभियान (SIR) कार्यशाळा– उपस्थिती– अभियान प्रदेश संयोजक माजी खा. डॉ.किरीट सोमय्या, जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत, महिला जिल्हाध्यक्षा श्वेता कोरगावकर, जिल्हा परिषद अध्यक्ष प्रमोद कामत, जिल्हा उपाध्यक्ष प्रसन्ना देसाई, संदिप गावडे, राजु राऊळ, नगराध्यक्ष राजन गिरप, शरद चव्हाण, शैलेंद्र दळवी आदी.







नाशिक येथे अल्पसंख्यांक मोर्चाची उत्तर महाराष्ट्राची विभागीय बैठक– उपस्थिती– भाजपा शहर जिल्हाध्यक्ष सुनील केदार, अल्पसंख्यांक मोर्चा सरचिटणीस एजाज शेख, सलीम बागवान आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

**प्रेषक,**

**कार्यालय मंत्री :**

भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com